रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ३७
www.ramprahar.com

◆ रविवार, २३ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'पुण्याच्या सीओईपीतील गोंधळ पूर्वनियोजित' / २
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख / ४
आजपासून भारत-श्रीलंका दुसरा कसोटी सामना / ८

## केंद्राकडून साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी



**नवी दिल्ली :** सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी केंद्र सरकारने सणासुदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच मोठे पाऊल उचलले आहे. वाढत्या किमती आणि घटत चाललेल्या पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता सुधारण्यासाठी सरकारने १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने यापूर्वी एक अधिसूचना जारी करून कच्च्या साखरेच्या आयातीवरील शुल्क मर्यादा तात्पुरती हटवली आहे. अशातच आता ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन कच्ची साखर कोणत्याही आयात शुल्काशिवाय देशात आयात केली जाईल. सणासुदीच्या काळात देशांतर्गत मागणी पूर्ण करणे आणि बाजारातील किमतींवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचलले आहे.

### नवी मुंबईत कॅम्पस कनेक्ट मोहिमेचा शुभारंभ

# विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून राष्ट्रउभारणीत योगदान द्यावे : मुख्यमंत्री

**नवी मुंबई : बातमीदार**

व्यसनांपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी शिक्षण, क्रीडा, कौशल्यविकास आणि राष्ट्रउभारणीत आपले योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.२२) येथे केले. नवी मुंबई पोलिसांच्या नशामुक्त नवी मुंबई अभियानांतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाविरोधात जनजागृती करण्यासाठी कॅम्पस कनेक्ट या विशेष मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

नेरूळ येथील डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटीज सेंटर ऑफ एक्सलन्स येथे आयोजित या सोहळ्यास राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, रोजगार हमी व फलोत्पादनमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेश बालदी, आमदार रवींद्र फाटक, आमदार विक्रांत पाटील, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, पनवेलचे महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, डी.वाय. पाटील महाविद्यालयाचे अध्यक्ष विजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजच्या तरुण पिढीमध्ये अमली पदार्थांचे वाढते आकर्षण आणि त्याचे होणारे गंभीर सामाजिक, शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेता नवी मुंबई पोलिसांनी या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत थेट पोहचण्याचा प्रयत्न केला आहे. महाविद्यालयीन शिक्षण हा युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याने या वयोगटात योग्य माहिती व जागरूकता निर्माण करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी भारताच्या 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा उल्लेख करत स्पष्ट केले की, देशाची ६५% युवाशक्ती ही आपली मोठी ताकद आहे. या युवाशक्तीला निष्प्रभ करण्यासाठी शत्रू राष्ट्रे आणि असामाजिक घटक तरुणांना व्यसनाच्या आहारी घालण्याचे षड्यंत्र रचत आहेत. या लढाईत अमली पदार्थांची पुरवठा साखळी (सप्लाय चेन) पूर्णपणे नेस्तनाबूत करणे आणि तरुणांमध्ये जागृती निर्माण करून मागणी (डिमांड साईड) संपवणे, असा सर्वांगीण (३६०-डिग्री) अप्रोच ही काळाची गरज आहे.

प्रत्येक शैक्षणिक कॅम्पस हे या लढाईचे केंद्र असून प्रत्येक विद्यार्थी या नशाविरोधी मोहिमेचा सैनिक आहे. व्यसनाच्या गर्तेत अडकलेल्या विद्यार्थ्यांना भेदभाव न करता व्यसनमुक्ती केंद्रांच्या (डी-एडिक्शन सेंटर) माध्यमातून मदत केली जाईल, असे सांगून स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा दाखला देत, योग्य दिशेने गेलेली युवाशक्ती समाजासाठी 'ऑक्सिजन' बनून संजीवनी देते, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

पोलीस, महापालिका, नागरिक आणि तरुणाईच्या संयुक्त प्रयत्नांतून नवी मुंबईला पूर्णपणे नशामुक्त आणि सुरक्षित बनवण्याचा संकल्प यावेळी सोडण्यात आला. तरुणाईच्या साथीने नशा पराभूत होईल आणि सुजलाम सुफलाम व विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



### नो टू ड्रग्जची सामूहिक शपथ

'कॅम्पस कनेक्ट' या उपक्रमाच्या शुभारंभावेळी सहभागी युवा आणि विद्यार्थ्यांना अमली पदार्थमुक्त जीवन जगण्याची सामूहिक शपथ देण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्र व व्यसनमुक्त चित्रफितीचे लोकार्पण करण्यात आले तसेच या अभियानानिमित्त आयोजित जनजागृतीपर पोस्टर्स व रील्स स्पर्धेत निवडलेल्या सर्वोत्तम प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### अत्याधुनिक सीसीटीव्ही कमांड सेंटरचे उद्घाटन

नवी मुंबईकरांच्या सुरक्षिततेत अधिक भर घालत गुन्हेगारीवर नियंत्रण आणि अत्याधुनिक देखरेखीसाठी सज्ज असलेल्या 'प्रहारी' इंटिग्रेटेड सीसीटीव्ही कमांड सेंटरचे (आयसीसीसी) उद्घाटन सीबीडी बेलापूर येथील पोलीस आयुक्त कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई महापालिका व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त सहकार्यातून या प्रकल्प साकारला आहे. 'ऑलवेज वॉचिंग, ऑलवेज प्रोटेक्टिंग' हे ब्रीदवाक्य असलेल्या या 'प्रहारी' प्रणालीमुळे शहरातील प्रत्येक हालचालीवर २४ तास बारीक नजर ठेवली जाणार असून वाहतूक नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी हे केंद्र नवी मुंबई पोलिसांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलीस ठाण्याच्या नूतन इमारतीचेही उद्घाटन यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

## राहुल गांधी यांच्या भूमिकेत संधीसाधूपणा -ॲड. नार्वेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे शनिवारी (दि.२२) 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमासाठी पुण्यात आले होते. दरम्यान, राहुल गांधी यांच्या या दौऱ्यावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी टीका केली. एवढी वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना राहुल गांधी यांनी कधी विद्यार्थी, युवा पिढीबाबत आवाज उठवलेला नाही. त्यामुळे त्यांच्या भूमिकेमध्ये संधीसाधूपणा दिसून येत आहे, अशा शब्दांत ॲड. नार्वेकर यांनी समाचार घेतला.

प्रसारमाध्यमांशी बोलताना ॲड. नार्वेकर म्हणाले की, राहुल गांधी यांना जर या देशातील युवापिढीबद्दल, त्यांच्या समस्यांबद्दल जर का आपुलकी, चिंता असती तर इतकी वर्षे ते लोकसभेचे सदस्य आहेत, विरोधी पक्षनेते आहेत, पण त्यांनी याबाबत कधीच आवाज उठवलेला दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या भूमिकेत संधीसाधूपणा दिसून येत आहे.

लोकशाहीमध्ये विरोध प्रदर्शित करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे, मात्र जी व्यक्ती लोकशाहीवर विश्वास ठेवते, ती असंवैधानिकरीत्या आपल्या विरोधाचे प्रदर्शन करत नाही. विरोधाच्या नावाखाली आपण हिंसाचार किंवा कुठल्याही प्रकारची अराजकता पसरवण्याचा प्रयत्न करत असाल, तर अशा कृत्यांवर कायदेशीर कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असेही नार्वेकर म्हणाले.

## पित्याकडूनच दोन मुलींवर अत्याचार

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

वडील आणि मुलीच्या नात्याला काळीमा फासणारी संतापजनक घटना रायगड जिल्ह्यात उघडकीस आली आहे. जन्मदात्या बापानेच आपल्या दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून या प्रकरणी मुलींच्या आईने पतीविरोधात माणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीने २०२४ ते जून २०२६ या कालावधीत आपल्या ११ आणि १४ वर्षीय मुलींवर वेळोवेळी अत्याचार केला. या नराधमाने पाबरे, म्हसळा, तळा, माणगाव, सातारा अशा वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन आपल्या मुलींवर बलात्कार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात पोक्सो कायदा तसेच भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## निवडक

### चारधाम यात्रेत ४८ लाखांहून अधिक भाविकांची उपस्थिती

**डेहरादून :** उत्तराखंडमध्ये मान्सूनच्या आव्हानात्मक परिस्थितीतही चारधाम यात्रेच्या १२५ दिवसांत ४८ लाखांहून अधिक भाविकांनी उपस्थिती दर्शविली आहे. ही संख्या गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत पाच लाख २२ हजार ६३४ने अधिक आहे. दरम्यान, यमुनोत्री धाममध्ये प्रथमच येथे ६.६८ लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले आहे.

### महाराष्ट्रातील चार शिक्षकांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड

**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या देशभरातील ४८ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे (बीड), कुंदा जयवंत बच्छाव (नाशिक), वैभव वसंतराव कुलकर्णी (लातूर), शिवप्रसाद अरविंद टिंगरे (सातारा) या चार शिक्षकांचा समावेश आहे. ४ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

## निसर्गाच्या सानिध्यात धोदाणी ते माथेरान इको-फ्रेंडली ट्रेक

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निसर्गरम्य डोंगररांगा, हिरवाईने नटलेला परिसर, आल्हाददायक वातावरण आणि ऊर्जेने भरलेले ट्रेकर्स अशा आनंददायी वातावरणात धोदाणी ते माथेरान इको-फ्रेंडली ट्रेक शनिवारी (दि.२२) मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत नागरिक, युवक, महिला आणि निसर्गप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वनराईच्या सानिध्यात ट्रेकिंगचा आनंद लुटला.

धोदाणी बसस्टॉप येथील श्री राम मंदिरापासून सकाळी ट्रेकला सुरुवात झाली. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात मार्गक्रमण करत धोदाणी ते माथेरानचा निसर्गरम्य डोंगराळ मार्ग ट्रेकर्सनी उत्साहाने सर केला. वाटेत दिसणाऱ्या हिरव्यागार डोंगररांगा, घाटवाटा आणि मनमोहक निसर्गदृश्यांनी ट्रेकर्सचा उत्साह अधिकच वाढवला. ट्रेकदरम्यान फिटनेस, आरोग्यदायी जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



या ट्रेकमध्ये भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहरे, पं.स. उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, आदर्श शिक्षण संस्थेचे चेअरमन धनराज विसपुते, पनवेल शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सागर सांगडे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश भगत, शहर चिटणीस रूपेश नागवेकर, विश्वजीत पाटील, अनेश ढवळे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, सरपंच सीताराम चौधरी, प्रशांत मोरबाळे, अंकुश पाटील, सतीश मालुसरे, निलेश भोईर, मंगेश पिलविळकर यांच्यासह इतर पदाधिकारी सहभागी झाले होते.

ट्रेकमध्ये सहभागी झालेल्या युवकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. चढ-उतार, डोंगरवाटा आणि निसर्गरम्य परिसरातून मार्गक्रमण करताना सहभागींच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद दिसून येत होता. **(पान २ वर..)**

### शारीरिक तंदुरूस्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश

या ट्रेकचे विशेष आकर्षण म्हणजे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः सहभागी होत नागरिकांसोबत ट्रेकिंगचा आनंद घेतला. युवक, महिला, नागरिक आणि निसर्गप्रेमींसोबत संवाद साधत त्यांनी सहभागींच्या उत्साहाला प्रोत्साहन दिले. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी एकत्रितपणे निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवत आरोग्यदायी जीवनशैलीचा अनुभव घेण्याचा हा उपक्रम सहभागींसाठी संस्मरणीय ठरला. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत नागरिकांनी काही काळ दैनंदिन व्यापापासून दूर जाऊन निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवावा, शारीरिक तंदुरूस्तीला प्राधान्य द्यावे आणि पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

## जेएनपीएची डबल स्टॅक झेप!

### पहिली लाँग-हॉल कंटेनर ट्रेन रवाना



**उरण : प्रतिनिधी**

देशातील प्रमुख कंटेनर बंदर असलेल्या जेएनपीएने समर्पित मालवाहतूक मार्गिकेवरील (डीएफसी) रेल्वे वाहतुकीत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जेएनपीएतून पहिली डबल स्टॅक लाँग-हॉल कंटेनर ट्रेन २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता मार्गस्थ झाली. या ट्रेनमधून ३६० टीईयूज आयात कंटेनरची वाहतूक करण्यात आली असून ती गुजरातमधील वर्णामा येथील सीजीएमव्हीच्या दिशेने रवाना झाली.

भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्स प्रा. लि.मार्फत हाताळण्यात आलेला हा आयात माल पीएसएच्या माध्यमातून बंदरात दाखल झाला होता. डबल स्टॅक लाँग-हॉल ट्रेनच्या या पहिल्या फेरीमुळे जेएनपीएची दीर्घ पल्ल्याची रेल्वे जोडणी अधिक मजबूत झाली असून बंदरातून आयात-निर्यात मालाची जलद आणि कार्यक्षम वाहतूक करण्यास मोठी चालना मिळणार आहे.

डबल स्टॅक पद्धतीने एका ट्रेनमधून अधिक कंटेनरची वाहतूक करणे शक्य होते. त्यामुळे रेल्वे मालवाहतुकीची क्षमता वाढण्याबरोबरच बंदरात दाखल झालेल्या कंटेनरची जलद उचल आणि पुढील गंतव्यस्थळी वाहतूक करता येणार आहे. विशेषतः आयात कंटेनरचा बंदरातील थांबण्याचा कालावधी कमी करण्यासाठी या सुविधेचा मोठा फायदा होणार आहे. लाँग-हॉल रेल्वेमुळे मोठ्या प्रमाणातील माल एकाच वेळी लांब अंतरावर पोहचवता येणार असल्याने वाहतूक व्यवस्थेतील अडथळे कमी होतील. परिणामी संपूर्ण पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम आणि गतिमान होण्यास मदत होणार आहे.

**आयात-निर्यात व्यापाराला नवी गती**

लाँग-हॉल डबल स्टॅक डीएफसी रेकमुळे बंदरातील मालाची जलद उचल आणि देशाच्या अंतर्गत भागात कार्यक्षम वाहतूक करण्याची क्षमता वाढणार आहे. परिणामी मालवाहतुकीचा वेळ कमी होऊन भारतीय आयात-निर्यात व्यापाराची स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होईल. जेएनपीएकडून पायाभूत सुविधा आणि संपर्कव्यवस्था मजबूत करण्यासाठी सातत्याने गुंतवणूक केली जात आहे. त्याचाच भाग म्हणून सुरू झालेली पहिली लाँग-हॉल डबल स्टॅक डीएफसी कंटेनर ट्रेन भारताच्या वेगवान, कार्यक्षम, विश्वासार्ह आणि स्पर्धात्मक बहुपर्यायी मालवाहतूक व्यवस्थेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

## विद्यार्थिनीची आत्महत्या; पाठोपाठ तलावात उडी मारणाऱ्या तरुणाचाही मृत्यू

**सावंतवाडी : प्रतिनिधी**

मुलाला वाचवताना कड्यावरून खाली पडून त्याच्या वडिलांचाही मृत्यू झाल्याची आणि या दोघांना पाहून आईनेही उडी घेत जीवन संपवल्याची दुर्दैवी घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडली. त्यानंतर आता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने सावंतवाडीतील मोती तलावात उडी मारून आत्महत्या केली. तिच्यापाठोपाठ तरुणानेही उडी घेतली. या घटनेत दोघांचाही बुडून मृत्यू झाला आहे.

प्राथमिक माहितीनुसार आत्महत्या करणारी विद्यार्थिनी लीशा गोसावी (१५) ही सावंतवाडीजवळील कारिवडे गावाची रहिवासी असून ती इयत्ता दहावीत शिकत होती, तर तिला वाचवण्यासाठी तलावात उडी घेणारा युवक रोहन गोसावी (२५) हा वैभववाडी तालुक्यातील नाधवडे येथील रहिवासी होता. रोहन हा कामानिमित्त मुंबईत वास्तव्यास होता. हे दोघेही एकमेकांचे नातेवाईक असल्याची माहिती समोर येत आहे. रोहनचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले आहे, तर लिशाचा मृतदेह शोधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. दरम्यान, लिशाने हे टोकाचे पाऊल का उचलले हे अद्याप अस्पष्ट असून सावंतवाडी पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## श्रावणात आरोग्यदायी रानभाज्यांची रेलचेल



**पाली : प्रतिनिधी**

दर्श अमावास्येनंतर श्रावण महिन्याचे आगमन होताच निसर्गाच्या कुशीत वसलेल्या सुधागड-पालीत निसर्गनिर्मित आरोग्यवर्धक रानभाज्यांची मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. श्रावणात मांसाहार वर्ज्य करून सात्विक आहाराला प्राधान्य दिले जात असल्याने बाजारात या रानभाज्यांना मोठी मागणी येत आहे.

श्रावणात सण-उत्सवानुसार तसेच वेगवेगळ्या दिवशी विशिष्ट रानभाजीचे महत्त्व आहे. श्रावण सोमवारी कौला/कैला, शुक्रवारी जिवतीची फुले, तर शनिवारी राजगिरा, कुर्डू, कुळी, टाकळा व आम्ली यांची पंचभेळी भाजी केली जाते. ऋषीपंचमीला देठी, देवभात, भारंगी, शेंडवेल, पाथरी, रानअळू अशा अनेक भाज्यांची मिसळ, गौरीच्या दिवशी केनी व कुर्डू, बैलपोळ्याला चवळीच्या पानांचे मुठे आणि वसुबारसेला सुरण, आळूकंद व काशी कोहळा यांची भाजी करण्याची परंपरा आहे.

या रानभाज्या केवळ चविष्ट नसून अत्यंत औषधी आहेत. कपाळफोडी भाजी आमवात (संधिवात), मलाविरोध, पाळीच्या समस्या व जुनाट खोकल्यावर गुणकारी असते. कंटोली मधुमेहींसाठी आणि डोकेदुखीवर उत्तम औषध ठरते. कुर्डूमुळे कफ, दमा आणि मूतखडा विकारात आराम मिळतो. आजारपणात तोंडाची चव गेली असल्यास आंबट-गोड 'चुका' ही भाजी रूच वाढवणारी मानली जाते.

कोणत्याही खत व कीटकनाशकाशिवाय पूर्णपणे नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या या भाज्या स्थानिक आदिवासी महिलांसाठी रोजगाराचे उत्तम साधन ठरत आहेत.

# सीओईपीतील गोंधळ पूर्वनियोजित

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात सीओईपीमध्ये झालेला गोंधळ हा पूर्वनियोजित असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राहुल गांधींच्या कार्यक्रमाला वातावरण मिळावे आणि कार्यक्रमाची पार्श्वभूमी तयार व्हावी यासाठी काँग्रेसने हा प्रकार घडवून आणल्याचे फडणवीस यांनी म्हटले. कॉलेज कॅम्पसमध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी हल्लाबोल करून मारामाऱ्या केल्याचा आरोपही त्यांनी केला.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, काल रात्रीचा गोंधळ काँग्रेसने ठरवून या कार्यक्रमाला रंगवण्यासाठी आणि कार्यक्रमाची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी केलेला प्रकार आहे. ज्या प्रकारे त्यांच्या नेत्यांनी कॉलेज कॅम्पसवर हल्लाबोल केला, मारामाऱ्या केल्या, ते अत्यंत दुर्दैवी आहे. या संपूर्ण प्रकारात एका विद्यार्थिनीचा काही लोकांच्या माध्यमातून दुरुपयोग करण्याचा प्रयत्न झाल्याचेही समोर आल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यामुळे सीओईपीमधील प्रकार हा काँग्रेसच्या इव्हेंट मॅनेजमेंटचा भाग असल्याचे त्यांनी म्हटले. राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाच्या आयोजनावरही फडणवीस यांनी प्रश्न उपस्थित केले.

कार्यक्रमात सुरुवातीला गाण्यांचे कार्यक्रम होणार असून त्यानंतर राहुल गांधी उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी सुमारे सात ते आठ हजार खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. रजिस्ट्रेशन सांगितले जात असले तरी ९० ते ९५ टक्के मुलींना काँग्रेस नेत्यांच्या कॉलेजमधूनच प्रवेश मिळणार आहे, असा आरोप फडणवीस यांनी केला. या कार्यक्रमासाठी इव्हेंट मॅनेजमेंटच्या माध्यमातून पैसे देऊन काही मुली आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना आणले जात असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. इन्फ्लुएन्सर्सना राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाबाबत केवळ सकारात्मक मजकूर प्रसारित करण्यास सांगितले जात असल्याचेही ते म्हणाले. राहुल गांधी आणि पार्टीबद्दल फक्त पॉझिटिव्ह टाका, निगेटिव्ह काही टाकायचे नाही, असे इन्फ्लुएन्सर्सना सांगितले जात आहे. त्यासाठी पैसे देण्याची तयारी आहे, असा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधींच्या कार्यक्रमापूर्वी झालेल्या कथित गोंधळाची तुलना फडणवीस यांनी चित्रपटाच्या प्रमोशनशी केली. एखादा पिक्चर रिलीज होण्यापूर्वी कॉन्ट्रोव्हर्सी उभी केली जाते आणि त्यातून पिक्चर हिट करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याच पद्धतीने राहुल गांधींच्या कार्यक्रमासाठी कॉन्ट्रोव्हर्सी उभी करण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या नेत्यांनी केला, असे ते म्हणाले.या प्रकरणात परदेशी निधीचा वापर झाल्याचा आरोपही करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित झाला. या कार्यक्रमासाठी नऊ ते दहा कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा करण्यात आल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

या आरोपांबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, नवनाथ बन यांनी केलेले आरोप पुराव्याच्या आधारावरच केलेले आहेत. त्यांनी सांगितलेल्या बाबींची निश्चितपणे पडताळणी केली जाईल. दरम्यान, संपूर्ण प्रकरणाची पोलिसांकडून दखल घेण्यात आली असून योग्य ती कारवाई केली जाईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

# वाशीतील कॉलेजमध्ये विद्यार्थ्यावर हल्ला

## सुट्टीच्या वेळी पोलीस गस्तीची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील राजीव गांधी कॉलेज (साईनाथ हायस्कूल) परिसरात वर्गमित्रांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून एका विद्यार्थ्यावर लोखंडी कड्याने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेमुळे शाळा व कॉलेज परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास वाशी, सेक्टर १० येथील राजीव गांधी कॉलेजमध्ये जेवणाच्या सुट्टीत दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये वाद झाला. या वादाचे रुपांतर हाणामारीत होऊन एका विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याच्या नाकावर कड्याने प्रहार केला. याप्रकरणी बाधिताच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून वाशी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी संबंधित अल्पवयीन बालकाला ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रियेनंतर समजपत्र देऊन पालकांच्या स्वाधीन केले आहे.

अशा घटना वारंवार पाहायला मिळत आहेत. सुट्टीच्या वेळी शाळा-कॉलेजच्या परिसरात विद्यार्थ्यांमध्ये वाद आणि भांडणे होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे राजीव गांधी कॉलेजसह परिसरातील इतर शाळा सुटण्याच्या वेळेस पोलीस प्रशासनाने बीट मार्शल किंवा पोलीस कर्मचाऱ्यांची विशेष गस्त ठेवावी, अशी जोरदार मागणी पालकांकडून केली जात आहे.

# पोलीस हवालदार विकास साळवी यांना सेवापदक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार विकास साळवी यांना भारत सरकार गृहमंत्रालय यांच्याकडून अतिउत्कृष्ट सेवापदकाने सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल त्यांच्यावर विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.



विकास प्रभाकर साळवी यांनी एपीएमसी, कळंबोली, खारघर, सीबीडी, पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे कर्तव्य बजावले. त्यांचे वडील प्रभाकर भालचंद्र साळवी (९३) हेदेखील सेवानिवृत पोलीस निरीक्षक आहेत. फर्गुसन कॉलेज पुणे येथून ते बीए झाले. त्यानंतर पोलीस सेवेत असताना मुंबई विद्यापीठातून एलएलबी आणि क्रिमिनलॉजी या विषयात मास्टर, एलएलएम शिक्षण पूर्ण केले. एलएलएम परीक्षेत मुंबई विद्यापीठात पाचवा क्रमांक पटकावला.

कायद्याचे उत्तम ज्ञान, उत्कृष्ट तपास कौशल्य याद्वारे पुराव्याची अचूक साखळी तयार केल्याने अनेक गंभीर खून, खुनाचा प्रयत्न, बँक दरोडा, जबरी चोरी असे गुन्हे दोषसिद्ध झाल्याने आरोपींना जन्मठेपेची शिक्षा मिळाली.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात मैत्री दिन उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणेतील श्रमिक शिक्षण मंडळ संचालित एफ. जी. नाईक महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे प्रथम वर्ष कला, विज्ञान (आयटी) व वाणिज्यतील विद्यार्थ्यांसाठी मैत्री दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. जयश्री दहाट, प्रा. समिधा पाटील, प्रा. सीमा शिंदे, प्रा. चिन्मयी वैद्य यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, खेळातून मैत्रीचा व एकात्मतेचा संदेश देत मैत्री दिनाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य निर्माण करत महाविद्यालयात आनंदाने मैत्री दिन साजरा केला. नशामुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बोडके, कोपरखैरणे पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पथनाट्य सादर करण्यात आले.

प्रथम वर्ष शाखेतील विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत करण्याच्या हेतूने घेतल्या गेलेल्या खेळांमधून मिस्टर आणि मिस फ्रेशर्स म्हणून प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील कु. आयुष शेवाळे व प्रथम वर्ष कला शाखेतील कु. अमृता माने यांची निवड झाली. तसेच बेस्ट फ्रेंड स्पर्धेत द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेतील कु. प्रगती पाटील, कु. पूर्वा नावडकर, कु. सानिका कदम, कु. सायली संकपाळ या विद्यार्थ्यांच्या ग्रुपची निवड झाली.



# गव्हाण विद्यालयातील १२ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथील अनुसूचित जाती जमाती संवर्गातील गेल्या वर्षी शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये इयत्ता पाचवी ते दहावीमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना कॅनरा बँकेच्या 'विद्या ज्योती' शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे.



विद्यालयातील तब्बल १२ विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती प्राप्त झाल्याने विद्यालयाच्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. कॅनरा बँकेच्या बीकेसी, मुंबई येथील मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राजेश टी. पाली, सहआयुक्त, आयकर विभाग, मुंबई तसेच कॅनरा बँकेचे वरिष्ठ अधिकारी व मुख्य व्यवस्थापक उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीच्या रकमेचे धनादेश तसेच भेटवस्तू म्हणून दप्तर आणि वॉटर बॉटल देण्यात आली. विद्यालयातील इयत्ता पाचवी ते सातवीमधील सहा विद्यार्थिनींना प्रत्येकी ३,००० रुपये, तर इयत्ता आठवी ते दहावीमधील विद्यार्थिनींना प्रत्येकी ५,००० रुपये शिष्यवृत्ती मिळाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी मोठी मदत होणार असून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळणार आहे.

या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थिनींना मिळवून देण्यासाठी विद्यालयाचे शिष्यवृत्ती विभागप्रमुख व ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. पात्र विद्यार्थिनींची आवश्यक कागदपत्रे संकलित करून ती कॅनरा बँककडे वेळेत सुपूर्द करणे, आवश्यक त्या प्रक्रियेचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळेपर्यंत सर्व बाबींची पूर्तता करणे अशी महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी बजावली. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यालयातील १२ विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला.

विद्यार्थिनींच्या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील आणि लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी सर्व शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थिनींचे तसेच त्यांच्या यशासाठी विशेष प्रयत्न करणारे महेश म्हात्रे यांचे अभिनंदन केले आहे. 'विद्या ज्योती' शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या गरजू आणि गुणवंत विद्यार्थिनींच्या शिक्षणाला मिळालेला हा भक्कम हातभार त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

विद्यालयातील विद्यार्थिनींनी मिळवलेल्या या यशाबद्दल पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही आनंद व्यक्त केला असून गुणवंत विद्यार्थिनींना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना या यशामुळे अधिक बळ मिळाले आहे.

# राज्यातून सहा हजार टन आंबा निर्यात

## आखाती युद्धानंतरही निर्यातवृद्धी

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आंबा हंगामावर आखाती युद्धाचे सावट होते. जपानने भारतीय आंब्याच्या आयातीवर बंदी घातली होती. या अडचणींवर मात करून महाराष्ट्रातून उच्चांकी आंबा निर्यात झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत सुमारे हजार टनांनी निर्यात वाढ होऊन राज्यातून विविध जातीच्या सहा हजार २८० टन आंब्यांची विकसित देशांना निर्यात करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रासह राज्यातील विविध निर्यात सुविधा केंद्रांचा प्रभावी वापर करून खासगी निर्यातदारांमार्फत



आवश्यक त्या प्रक्रिया पूर्ण करून यंदाच्या हंगामात विविध जातीच्या सहा हजार २८० टन आंब्यांची विकसित देशांना निर्यात करण्यात आली. यापैकी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधांमधून ४ हजार ९७४ टन आंब्याची निर्यात करण्यात आली आहे. गतवर्षी राज्यातून ५ हजार ५४० टन आंब्यांची निर्यात झाली होती.

मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती, आंतरराष्ट्रीय वाहतूक व्यवस्थेवर झालेला परिणाम, वाढलेले माल वाहतूक खर्च तसेच जागतिक व्यापारातील अनिश्चितता अशी प्रतिकूल परिस्थिती असूनही यंदा आंबा निर्यातीत गतवर्षीच्या तुलनेत ७४० टनांची, म्हणजेच सुमारे १३.४ टयांची वाढ नोंदविण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून देण्यात आली. या वर्षी आंब्याच्या निर्यातीमधून साधारणपणे सुमारे १५७ कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त झाले आहे. भारतातून होणाऱ्या एकूण आंबा निर्यातीपैकी सुमारे ८० ते ८५ टक्के आंब्यांची निर्यात महाराष्ट्रातील आंब्यांची होते.

पान १ वरुन

## निसर्गाच्या सानिध्यात धोदाणी ते माथेरान इको-फ्रेंडली ट्रेक

ट्रेकिंगच्या माध्यमातून शारीरिक व्यायामासोबतच आत्मविश्वास, साहस, संयम आणि समूहभावना वाढण्यास मदत होते, हा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. मित्र-परिवारासह सहभागी झालेल्या नागरिकांनी निसर्गरम्य परिसरातील विविध क्षण आपल्या आठवणींमध्ये साठवले. डोंगरमाथ्यावर पोहचल्यानंतर सहभागींच्या उत्साहाला उधाण आले. 'निसर्गाचा आनंद घ्या, निसर्गाचे संवर्धन करा' या संदेशाने संपूर्ण ट्रेकमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

हा केवळ मनोरंजनासाठी आयोजित केलेला ट्रेक नाही, तर पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणारा उपक्रम ठरला. निसर्गाचा आनंद घेताना त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे याची जाणीव सहभागींना करून देण्यात आली. परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा न टाकणे आणि निसर्गसंपदेचे जतन करणे याबाबतही सकारात्मक संदेश देण्यात आला.

धोदाणी ते माथेरान या निसर्गरम्य मार्गावर अशा आगळ्यावेगळ्या आणि आरोग्यदायी उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सहभागी नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे मनापासून आभार मानले. धावपळीच्या जीवनातून नागरिकांना निसर्गाच्या सानिध्यात आणत फिटनेस, साहस आणि पर्यावरण संवर्धनाची सांगड घालणारा हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी असल्याची भावना सहभागींनी व्यक्त केली. विशेषतः युवकांना ट्रेकिंग, फिटनेस आणि निसर्ग संवर्धनाकडे आकर्षित करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचेही सहभागींनी सांगितले.


# कॅनरा बँकेकडून विद्या विकास मंदिरच्या विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

**कर्जत : प्रतिनिधी**

कॅनरा बँकेच्या कर्जत शाखेकडून महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर या शाळेतील पाचवी ते दहावी मधील सहा विद्यार्थिनींना कॅनरा विद्या ज्योती योजनेतून शिष्यवृत्ती देण्यात आली. महिला मंडळाच्या सभागृहात एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाखा व्यवस्थापक धनराज आंबेतकर, माजी उपनगराध्यक्ष उमेश गायकवाड, विकास चित्ते, दीपक भालेराव, हेमंतकुमार आदी उपस्थित होते.

माजी मुख्याध्यापिका मीना प्रभावळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका स्नेहा गाढे यांनी प्रास्ताविकात शाळेचा चढता आलेख सांगितला.याप्रसंगी कु. समीक्षा शैलेश चव्हाण (पाचवी), कु. अनुष्का गणेश रोकडे (सहावी), कु. प्रशिका विजय मोरे (सातवी), कु. शुभ्रा मंगेश भोईर (आठवी), कु. समृद्धी भरत देसाई (नववी) आणि कु. श्रावणी सचिन ओव्हाळ (दहावी) यांना शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झालेले पासबुक देण्यात आले. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष गायकवाड यांनी, ही शाळा महिला चालवत आहेत. दिवसेंदिवस शाळेची भरारी चांगल्या प्रकारे सुरू आहे.

या शाळेत माईकच्या स्टँडची कमतरता आहे. तो स्टँड मी माझ्याकडून शाळेला भेट देऊ इच्छितो, असे जाहीर केले.प्रभावळकर यांनी, आमच्या शाळेत अत्यंत गरीब व गरजू विद्यार्थी शिकत आहेत. आमच्या शिक्षिकांच्या मेहनतीमुळे शाळेची प्रगती होत आहे. अजूनही काही कमतरता आहे. त्यासाठी शाळेला सहकार्य करावे, असे आवाहन केले.



# महसूल कर्मचाऱ्यांकडून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

## खालापूर तहसीलदारांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने नूतन तहसीलदार कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा देण्याऐवजी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्यक्ष वृक्षारोपण करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.नूतन तहसीलदार कार्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.



या उपक्रमामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच कार्यालयाच्या परिसराचे सुशोभीकरण होण्यासही हातभार लागणार आहे. कार्यालयीन परिसर अधिक हिरवागार, प्रसन्न आणि पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.यावेळी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महसूल विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी तसेच अभय चव्हाण यांचे हितचिंतक उपस्थित होते. उपस्थितांनी चव्हाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना तहसीलदार अभय चव्हाण यांनी आपल्या दैनंदिन आयुष्यातील महत्त्वाचा दिवस वृक्षारोपणासारख्या विधायक उपक्रमाने साजरा करण्याचा आनंद वेगळाच असतो. वाढदिवसाच्या निमित्ताने लावलेले हे वृक्ष केवळ आजच्या कार्यक्रमाची आठवण न राहता भविष्यात अनेकांना सावली, शुद्ध हवा आणि पर्यावरणाचा आधार देणारे ठरावेत, अशी भावना व्यक्त केली. तसेच लावलेले प्रत्येक झाड महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दत्तक घेऊन त्याची नियमित देखभाल, पाणीपुरवठा आणि संगोपन करण्याचे आवाहन त्यांनी केले. केवळ वृक्षारोपण करून थांबणे महत्त्वाचे नसून, लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करणे हीच खरी पर्यावरणसेवा असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

वाढदिवस, जयंती केवळ शुभेच्छा व औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता समाज आणि पर्यावरणासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधी म्हणून साजरे करता येतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# चोरीच्या टेम्पोसह आरोपी गजाआड

## पळस्पे महामार्ग पोलिसांची कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथील पोलीस उपनिरीक्षक केदार कुंभार व त्यांच्या पथकाच्या सतर्कतेमुळे चोरीस गेलेला टाटा ४०७ टेम्पो आणि संशयित आरोपीला अवघ्या काही तासांत शिताफीने पकडण्यात यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार २१ ऑगस्ट रोजी रात्री गस्त घालत असताना अँटॉप हिल पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विन कुमार कागले यांनी महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथील ड्युटी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक केदार भीमराव कुंभार यांना फोनवरून महत्त्वपूर्ण माहिती दिली. जनरेटरसह असलेला सिल्व्हर रंगाचा टाटा ४०७ टेम्पो (क्रमांक एमएच ०४ डीटी ३७८१) चोरीला गेला असून तो पुण्याच्या दिशेने जात असल्याचे त्यांनी कळवले.

माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक केदार कुंभार आणि पळस्पे पेट्रोलिंग मोबाईलवरील अंमलदार पोहवा २४७२ किरण सुरेश महाजन व पोहवा २३१३ अतुल माणिकराव जगताप यांनी तातडीने परिसरात शोधमोहीम सुरू केली. महामार्गावरील अमेठी पार्किंग परिसरात गस्त घालत असताना, एका गाडीच्या आडोशाला संशयितरीत्या उभा असलेला सदर टेम्पो महामार्ग पोलिसांना आढळून आला. वाहनाची बारकाईने तपासणी केली असता तो चोरीचाच टेम्पो असल्याचे स्पष्ट झाले. पोलीस उपनिरीक्षक केदार कुंभार व पथकाने टेम्पो चालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. पोलिसांचा संशय बळावल्याने त्यांनी अश्विन कुमार कागले यांना तत्काळ घटनास्थळी पाचारण केले.

अधिक चौकशीत चालकाचे नाव कुंदन कुमार मिश्रा असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस उपनिरीक्षक केदार कुंभार आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या या प्रसंगावधानामुळे चोरीचा मुद्देमाल तात्काळ हस्तगत करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाईसाठी संशयित आरोपी कुंदन कुमार मिश्रा आणि जप्त केलेला टेम्पो अँटॉप हिल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

# पनवेल तालुका पोलिसांच्या कारवाईत घरफोडीतील चार लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत वावंजे येथील एस. एस. इंजिनिअरिंग कंपनीच्या गोदामातून चार लाख ५० हजार रुपये किमतीचे १८० मशिन पार्ट्स चोरी करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली असून चोरीचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली दोन वाहने असा एकूण १२ लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१४ ते १७ ऑगस्टदरम्यान वावंजे येथील एस. एस. इंजिनिअरिंग कंपनीच्या गोदामात ठेवण्यात आलेले १८० मशिन पार्ट्स चोरीला गेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. याप्रकरणी गुन्हा रजि. क्र. २२८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक तपास तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून मोहम्मद आलीम अली हसन मन्सुरी (४५), मोहम्मद इर्शाद अली हसन मन्सुरी (३३) आणि कैस अनवर पटेल (३२) यांना अटक केली. आरोपींच्या पोलीस कोठडीदरम्यान केलेल्या तपासात चोरीचे चार लाख ५० हजार रुपये किमतीचे १८० मशिन पार्ट्स जप्त करण्यात आले. तसेच गुन्ह्यात वापरलेली ८० हजार रुपये किमतीची ऑटोरिक्षा आणि चार लाख रुपये किमतीची बोलेरो पिकअप पोलिसांनी ताब्यात घेतली.

तपासात याच आरोपींकडून आणखी काही चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये ४६५ स्टेनलेस स्टील क्यूआरसी मेल पार्ट्स, केबलमधील तांब्याच्या तारा आदी मुद्देमालाचा समावेश असून विविध गुन्ह्यांतील एकूण सात लाख २२ हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अशा प्रकारे चोरीचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली वाहने मिळून पोलिसांनी एकूण १२ लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपींच्या इतर साथीदारांचा शोध सुरू असून पुढील तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे, पोलीस उपआयुक्त रश्मी नांदेडकर आणि सहायक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक आनंदा कांबळे, सहायक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे, पोलीस उपनिरीक्षक दीपक शेळके तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

# पनवेलमध्ये एक किलो २३६ ग्रॅम गांजा जप्त

## एकास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी मालधक्का झोपडपट्टी परिसरात कारवाई करत एका तरुणाकडून तब्बल एक किलो २३६ ग्रॅम गांजा जप्त केला असून सुमारे ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या गांजाची अंदाजे किंमत ६३ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांच्या नोंदीत नमूद करण्यात आली आहे.

याप्रकरणी गणेश मनोज चव्हाण (३२, रा. पनवेल रेल्वे स्टेशनजवळ, मालधक्का रोड झोपडपट्टी) याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पनवेल रेल्वे स्टेशनच्या पाठीमागील मालधक्का झोपडपट्टी परिसरात ही कारवाई करण्यात आली. संशयिताकडून हिरवट पाने, फुले, काड्या व बिया असलेला ओलसर व उग्र वासाचा गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई वपोनि. बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. अभिजित पाटील, पोउपनि. हजरत पठाण, सचिन कारे आदींच्या पथकाने केली.

## जितेंद्र इंगळे-पाटील यांना उपजिल्हाधिकारीपदी बढती

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेलचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील यांची उपजिल्हाधिकारीपदी बढती करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारीपदी बढती मिळाल्याबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

जितेंद्र मारुती इंगळे हे अहिल्यानगर येथील असून यापूर्वी त्यांनी कागल (कोल्हापूर), बागलन (नाशिक), वैजापूर (संभाजीनगर), किनवट (नांदेड) येथे तहसीलदार म्हणून काम पाहिले आहे. पनवेलमध्ये गेल्या काही वर्षांपासून ते अपर तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत.

# विनायक मुंडे भाजप उत्तर रायगड भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हा सहसंयोजकपदी



**पनवेल : वार्ताहर**

भाजप उत्तर रायगड भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हा सहसंयोजकपदी विनायक मुंडे यांची निवड करण्यात आली. यावेळी भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांच्या उपस्थितीत विनायक मुंडे यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

निवड कार्यक्रमास भाजप महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस तथा पनवेलचे महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभागृहनेते व सरचिटणीस प्रकाश बिनेदार, सरचिटणीस दीपक बेहेरे, प्रीतम म्हात्रे, सर्व मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते.

भाजपच्या संघटनात्मक विस्तारासोबतच भटके-विमुक्त समाजाच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्यासाठी व समाजाच्या विकासासाठी काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. उत्तर रायगडमध्ये भटके-विमुक्त आघाडीचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी विनायक मुंडे यांच्या निवडीचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## टपाल नाका परिसरात अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टपाल नाका, पनवेल-महाराष्ट्र हॉटेलच्या मागील परिसरात एक अनोळखी व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

मृताचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे असून उंची ५ फूट ४ इंच आहे. रंग सावळा, चेहरा गोल, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस बारीक, दाढी वाढलेली आणि पांढऱ्या रंगाची असून अंगात नेसून काळ्या रंगाची फुल पॅन्ट व चॉकलेटी हाफ टी-शर्ट असा पोशाख असल्याचे वर्णन अहवालात करण्यात आले आहे. या व्यक्तीची ओळख पटलेली नसून त्याचे नातेवाईक किंवा वारसदार यांचा शोध घेण्यासाठी पनवेल शहर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. संबंधित व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस किंवा सपोनि चंद्रकांत मेटे यांच्याशी संपर्क साधावा.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त तोंडरेत मोफत वह्यावाटप

## उपसरपंच अमृता पाटील यांच्याकडून शाळेला दोन स्टँड फॅन भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि. २२) सकाळी ११ वाजता राजिप शाळा तोंडरे येथे मोफत वह्यावाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच यावेळी तोंडरे येथील उपसरपंच अमृता श्रीनाथ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या मीटिंग हॉलसाठी दोन स्टँड फॅन देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पक्ष तोंडरे यांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमास माजी सरपंच नारायण शेठ, माजी सरपंच वासुदेव पाटील, उद्योग आघाडी अध्यक्ष महेश पाटील, माजी नगरसेवक अरुणा दाबणे, उपसरपंच अमृता पाटील, तेजश्री पाटील, किरण पाटील, सुगंधा पाटील, वासुदेव पाटील, नाना पाटील, सुनील म्हात्रे, जगन्नाथ डोंगरे, श्रीनाथ पाटील आणि सागर पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : येथील ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कलच्या वतीने मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय पत्रकार प्रेरणा पुरस्कार सोहळ्यात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या उल्लेखनीय सन्मानाबद्दल भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी संजय कदम यांचे अभिनंदन केले. यावेळी ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कलचे विश्वस्त गणेश कोळी, अ‍ॅड. मनोज म्हात्रे उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात आनंददायी शनिवार साजरा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण- कोपर येथे शनिवारी (दि. २२) 'शनिवार माझ्या आवडीचा' या उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध कलात्मक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत हा शनिवार खऱ्या अर्थाने आनंददायी बनविला.



इयत्ता पाचवीच्या तिन्ही वर्गांचा हा आनंददायी शनिवार वर्गशिक्षिका माधुरी म्हात्रे तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या आवडीच्या 'शनिवार माझ्या आवडीचा' या गीताने करण्यात आली. नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला व कलाकौशल्याला वाव देत रंगीबेरंगी व आकर्षक राख्या स्वहस्ते तयार केल्या. तसेच विद्यालयात विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे करण्याच्या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी सुंदर व कल्पक वाढदिवसाचे भेटकार्ड तयार केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेबरोबरच स्वावलंबन, सहकार्य आणि कलात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळाले. राखी बनवण्यात नव्या कोळी, आराध्या पाटील, तेजस विश्वकर्मा आणि प्रिया गायकवाड या विद्यार्थ्यांचे, तर भेटकार्ड बनविण्यात संस्कृती कोळी, श्लोक पाटील, ईश्वर नागरे, भूमिक म्हात्रे या विद्यार्थ्यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांक आले. यानंतर दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी नृत्य आणि गीतांचा सुंदर मेळ रंगला.

अनेक विद्यार्थ्यांनी त्यांना पाठ असलेली गीते उत्स्फूर्तपणे सादर केली, तर काही विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यकौशल्याने उपस्थितांची मने जिंकली. त्यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहाने व आनंदाने भारून गेले. उपक्रमाला विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेल्या राख्या व भेटकार्डांची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व कलागुणांचे कौतुक करत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंदासोबतच सर्जनशीलता, स्वावलंबन आणि कलात्मक अभिव्यक्तीची संधी मिळाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गव्हाण विद्यालयातील इयत्ता पाचवीचा हा शनिवार खऱ्या अर्थाने आनंददायी शनिवार ठरला.

## नवीन पनवेलमध्ये आशा सेविकांसाठी आशा की किरण प्रशिक्षण उपक्रम

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीच्या वतीने आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल एलाइटच्या सहकार्याने आशा सेविकांना माता व बाल आरोग्याबाबत अद्ययावत माहिती देण्यासाठी आशा की किरण या विशेष प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात १२० आशा सेविकांनी सहभाग घेतला. या उपक्रमाचा उद्देश आशा सेविकांना माता व बाल आरोग्याबाबत अद्ययावत माहिती व मार्गदर्शन देऊन त्यांच्या कार्याला अधिक सक्षम करणे हा होता.



या प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. आशा की किरण या उपक्रमाच्या माध्यमातून आशा सेविकांना माता व बाल आरोग्याशी संबंधित महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन मिळाले.कार्यक्रमातील तज्ज्ञ वक्ते म्हणून चित्रा कुलकर्णी यांनी बालकांचे पोषण व आहार, शिल्पा गांधी यांनी बालकांच्या विकासाचे निरीक्षण, शोभना पालेकर यांनी गर्भवती व प्रसूतीनंतरच्या महिलांचे पोषण, स्वाती लिखिते यांनी लसीकरणाचे महत्त्व याविषयी माहिती दिली.या उपक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन ध्वनी तन्ना असून प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर प्रकाश पाटील, आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

यावेळी इनरव्हील क्लब पनवेल सिटीच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र आपटेची आशा सेविका रुपाली पाटील व नेरेची निर्मला दाभणे यांनी संपूर्ण वर्षामध्ये उत्कृष्ट कार्य करून तीन जीवांचे प्राण वाचवले म्हणून पैठणी आणि शाल, श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. त्यांना एक असे दोन सेट्स पल्स ऑक्सिमीटर व बीपी उपकरणांचे वाटप करण्यात आले.

# वडापाव दिवस २३ ऑगस्ट
# सिनेमाच्या जगातही भारी टेस्टी!








**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

वडापाव असं म्हणताक्षणीच तुम्हा प्रत्येकाच्या जीभेवर म्हणा, डोळ्यासमोर म्हणा, आठवणीत म्हणा त्याची चव आलीच असणार. अशा आपल्या मराठी माणसाचं भावविश्व समृद्ध केलेल्या वडापावचा २३ ऑगस्ट हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्ताने आज पुन्हा एकदा वडापाव खा.

वडापाव आणि फिल्मवाले यांचेही जबरा नातं आहे. मला काही फिल्म दीवाने प्रश्न करतात, तुम्ही मिनर्व्हा चित्रपटगृहात शोले पुन्हा पुन्हा एन्जॉय केलेल्या पिढीतील आहात, तेव्हा वडापाव किती पैशात मिळे.... यावर मी पटकन उत्तर देतो, पन्नास वर्षांपूर्वी वडापाव दहा पैशांत मिळे. आणि विशेष म्हणजे, त्या काळातील एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये पिक्चरचे मध्यंतर होताच बाहेर रस्त्यावरही यायला मिळे आणि रस्त्यावरचा लसूण चटनीसह वडापाव मुठीत पकडून पुन्हा आत जाऊन पडद्यावरचा चित्रपट पाहत पाहत तो खात असू. 'शोले'च्या त्या जबरदस्त क्रेझ असल्याच्या दिवसांत मिनर्व्हा चित्रपटगृहाबाहेर वडापाव विकण्याचा व्यवसाय करणाऱ्याने पाच वर्षांनी स्वतःचे हॉटेल सुरू केले अशी त्या काळात एका इंग्रजी सायं दैनिकात विशेष 'सक्सेस स्टोरी' प्रसिद्ध केली आणि आजही ही गोष्ट चवीचवीने सांगितली जाते.

मी दक्षिण मुंबईतील कुलाबा येथील रिगल चित्रपटगृहापासून ताडदेवच्या डायना थियेटरपर्यंतच्या कुठेही पिक्चर पाहायला गेलो की मध्यंतर होताच बाहेर रस्त्यावर येऊन वृत्तपत्राच्या कागदात मिळणारा वडापाव आवर्जून खात असे आणि माझ्यासारखे अनेक फिल्म दीवाने हे जणू व्रत असल्यासारखे एन्जॉय करत. रॉक्सी, स्वस्तिक अशा काही चित्रपटगृहातील कॅन्टीनमध्ये वडापाव मिळे, पण तो पंधरा पैसे असे आणि माझ्यासारखे मध्यमवर्गीय विचार करत असे पाच पैसे वाचवले तर काही महिन्यांनी एक रुपया पाच पैसे तिकीटात मॅटीनी शोला एकादा जुना चित्रपट पाहू.

मी मिडीयात आल्यावर गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीत ऐंशीच्या दशकात असलेल्या कॅन्टीनमध्ये वडापाव खाऊनच मराठी अथवा हिंदी चित्रपटाच्या सेटवर जात असे.

एकदा कपिल शर्मा शोमध्ये जयाप्रदाने सेटवर राजेश खन्नाच्या उशिरा येण्याचा किस्सा रंगवून सांगितला. ती म्हणाली, सकाळी दहा वाजल्यापासून मी मेकअप करून तयार असे. राजेश खन्ना दुपारी चार वाजता स्टुडिओत येई. आल्यावर वडापाव खाई आणि मग चित्रीकरणाला सुरुवात होई. जयाप्रदाने स्वतःच हा अनुभव सांगितला. यावरून मला वाटतं, राजेश खन्ना अनेक वर्षे आमच्या गिरगावातील ठाकूरद्वार नाक्यावरील सरस्वती निवास येथे रहायचा, म्हणून त्याला वडापाव आवडता झाला असेल आणि ती आवड तो कधीच विसरला नाही.

तुम्ही आम्हीदेखील वडापाव खातोय, त्याचे हुकमी चवीचे 'हॉट स्पॉट' आपल्यालाही सवयीचे झालेत. जिभेला काही गरमागरम खावसं वाटलं की आपण एकाद्या कॉर्नरचा असो, नाक्यावरचा असो, रस्त्यावरचा असो, शिवसेना शाखेबाहेरचा असो, हॉटेलचा असो आपली पावले आपोआपच तेथे वळतात. मल्टीप्लेक्समधला वडापाव मात्र महाग आहे. सर्वच मल्टीप्लेक्समध्ये तो मिळत नाही. जेथे आहे तेथे दोनशे रुपयांत दोन वडापाव असं आहे. कसा परवडेल?

ते काही असो. वडापाव ही मुंबईची एक ओळख आहे, खाद्य संस्कृतीतील एक हुकमी फंडा आहेच. म्हणून तर 'ॲपल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी टीम कूक हे आयफोन कंपनीच्या भारतातील पहिल्याच स्टोअर्सच्या उदघाटनासाठी मुंबईत आले असताना आपल्या माधुरी दीक्षितने त्यांना वांद्रा कुर्ला संकुलातील बिझनेस डिस्ट्रिक्टमध्ये वडापाव खिलवला याची ब्रेकिंग न्यूज झाली. माधुरी दीक्षित म्हणजे बातमी हे सुपर डुपर हिट समीकरण आहे.मिडीयात ही बातमी फोटोसह हुकमी ठरली. हे श्रेय वडापावचे आणि माधुरीचेही.

पडद्यावरही माधुरी दीक्षितने बटाटा वडा एन्जॉय केलाय. मजा अशी की बटाटा वडा महाराष्ट्रीय, पण गीत संगीत नृत्य साऊथ इंडियन असा अजब मामला रंगला. अर्थात, तुम्हालाही माहित्येय पारंपरिक मसालेदार मनोरंजक लोकप्रिय चित्रपटात केव्हाही/ कधीही/काहीही घडू/बिघडू शकते, त्याच अलिखित नियमानुसार हे गीत संगीत व नृत्य झाले म्हणावे, पण म्हणून काय बटाटा वडा गाणे चक्क साऊथ इंडियन पद्धतीचे असावे? प्रयाग राज दिग्दर्शित 'हिफाजत' (१९८७) या चित्रपटात अगदी तस्सेच झाले. अनिल कपूर आणि माधुरी दीक्षित यांच्यावरचे बटाटा वडा हे मसालेदार टेस्टी गाणे अगदी तस्सेच आहे. विशेष म्हणजे दक्षिणेकडील तीन चार रुपात ते साकारलयं. आणखी एक विशेष म्हणजे अनिल कपूर या चित्रपटात रामकुमार आणि राजकुमार अशा दुहेरी भूमिकेत आहे, तर माधुरी दीक्षित जानकी या साऊथ इंडियन युवतीच्या भूमिकेत आहे. आता तिला सिनेमात का असेना पण वडापाव हवासा झाला तेव्हा ती मुंबईकर झाली म्हणायचे. त्या दिवसांत ती मुंबईत अंधेरी पूर्वच्या जे.बी. नगर भागात रहायची आणि तेथे वडापाव टेस्टी मिळतो असे तीच त्या दिवसांत आपल्या मुलाखतीत सांगायची.

एखाद्या गोष्टीला किती कनेटीव्हीटी असते बघा. 'हिफाजत'चे निर्माते ए. सूर्यनारायण हे साऊथ इंडियन असल्याने गाण्यात तसे झाले असावे. दिग्दर्शक प्रयाग राज हे मनमोहन देसाईंच्या चित्रपटाच्या लेखकांपैकी एक होते. मनजींच्या चित्रपटात काय वाट्टेल ती धमाल चालायची, तशीच ती येथेही चालेल असे वाटले असण्याची दाट शक्यता आहे आणि हे गाणे लोकप्रिय झाले आणि त्यामुळेच हा चित्रपट माहिती झाल्याने तर या गाण्याचा हेतू साध्य झाला असेच म्हणावे लागेल. हे गीत मजरूह सुल्तानपुरी यांनी लिहिले असून संगीत राहुल देव बर्मनचे संगीत आहे. आशा भोसले आणि एस. बालसुब्रह्मण्यम यांनी ते गायले आहे. येथेही महाराष्ट्रीय आणि साऊथ इंडियन असे जबरा कॉम्बिनेशन आहे. प्रेक्षकांचे मनोरंजन करायचे तर अशा अनेक गोष्टींची सरमिसळ होतच असते. ती वडापावसारखी टेस्टी हवी.. ती एन्जॉय करायची इतकेच!

वडापावची चटकमटक इतक्यावरच थांबत नाही. एकदा शिल्पा शेट्टी जुन्या मुंबई-पुणे रोडने मुंबईला येत असतानाच तिला खोपोलीतील फेमस वडापाव सेंटर दिसताच तिने गाडी थांबवून गरमागरम वडापावचा मस्त आस्वाद घेतला. हातोहाती मोबाईल कॅमेरा असल्याच्या आजच्या डिजिटल युगात लगेचच या 'खाद्य क्षणा'चे शूटिंग झाले आणि ती मुंबईत पोहचेपर्यंत ही चक्क वृत्तवाहिन्यांची बातमीही झाली. म्हटलं ना, सेलिब्रिटीजच्या अगदी छोट्या छोट्या गोष्टींतून न्यूज जन्माला येते (म्हणून आता अनेक सेलिब्रिटीज कुठे कुठे वडापाव खाण्याची आपली रिल्स सोशल मिडियात पोस्टही करतील.) जॉन अब्राहम चित्रपटसृष्टीत नवीन असताना आपण अंधेरीतील जम्बो दर्शन सोसायटीत राहत असताना आपण वडापाव आवर्जून खायचो असे आवर्जून सांगायचा.

...तुम्ही राज कपूर दिग्दर्शित सर्वात तरुण चित्रपट 'बॉबी' अनेकदा एन्जॉय केला असेलच. त्यात राजा (ऋषि कपूर) जेव्हा मिसेस ब्रिगेन्झा (दुर्गा खोटे) यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त दिलेली भेट पाहून त्यांना भेटायला वस्तीत जातो तेव्हा बॉबी (डिंपल कापडिया) दरवाजा उघडते तेव्हा ती किचनमधून आलेली असते आणि तिच्या उजव्या हाताला चणा पीठ लागलेले असते, अशातच त्याच हाताने ती बटा जरा बाजूला सरकवते, तेव्हा तिच्या केसांना तिच्या हाताचे चणा पीठ लागते. (डिंपलची ही मुद्रा मनात फिट्ट बसलीय. या एका दृश्यासाठी 'बॉबी' पुन्हा पुन्हा पाहू शकता.) आता चणा पीठ म्हटलं म्हणजे, भजी अथवा बटाटा वडा असू शकतो... नक्की काय ते राज कपूर जाणे, पण हा सीन भारी आहे..

सिनेमा आणि वडापाव हे नाते भन्नाट आहे हो. हिंदी चित्रपटसृष्टीत काही अमहाराष्ट्रीयन स्टार मुंबईतील आवडता पदार्थ म्हणून वडापाव सांगतात, मात्र ते आपलं उगाच बोलतात हे त्यांच्या एक्प्रेशनवरून जाणवते, पण फिल्मी मुलाखतीतील असे अनेक प्रश्न फार सिरीयसली घ्यायचे नसतात.

एकदा आपल्या विजय कदमला लंडनमध्ये वडापाव मिळाल्याची त्याने सोशल मिडियात फोटोसह पोस्ट शेअर केली. तशी वडापावला मुंबई, पुण्यात सर्वाधिक मागणी. विक्री. उलाढाल वगैरे वगैरे. कोणत्या खाऊगल्लीत टेस्टी बटाटा वडा मिळतो याची चवदार माहिती असलेले खादाडे खूपच. आठवणीही खूप.

प्रसाद ओकने आपल्या मराठी चित्रपटांची शंभरी गाठली त्या चित्रपटाचे नाव आहे "वडापाव." आता वडापाव म्हटलं की जिभेला पाणी सुटतं. वडा जसा तिखट-चुरचुरीत असतो तसंच नात्यांमध्येही गोडवा, आपलेपण आणि तिखटपणा, थोडासा झणझणीतपणा असला तरच ती नाती खरी रंगतदार होतात. अगदी हाच अनुभव देणारा कौटुंबिक चित्रपट 'वडापाव' आहे. ही रूचकर पाककृती प्रसाद ओक प्रेक्षकांसाठी घेऊन आले. या चित्रपटात प्रसाद ओक पहिल्यांदाच एकाच वेळी दिग्दर्शक आणि अभिनेते अशा दुहेरी भूमिकेत झळकले.

या चित्रपटात प्रसाद ओक, अभिनय बेर्डे, गौरी नलावडे, रसिका वेंगुर्लेकर, शाल्व किंजवडेकर, रितिका श्रोत्री, समीर शिरवाडकर, सिद्धार्थ साळवी, अश्विनी देवळे-किन्हीकर आणि सविता प्रभुणे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.


दिग्दर्शक प्रसाद ओक म्हणाले, 'वडापाव' एक अशी गोष्ट आहे जी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडतेच. हाच आमच्या चित्रपटाचा गाभा आहे. कुटुंब, त्यांच्या नात्यांतील गोडवा-तिखटपणा आणि त्यातून मिळणारा भावनिक व विनोदी अनुभव अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडावा असाच प्रयत्न या चित्रपटात केला.

एका अतिशय झगमगीत भव्य दिव्य दिमाखदार चित्रपट पुरस्कार सोहळ्यात शाहरूख खान चकचकीत महागड्या दिखाऊ चित्रपटांची तारीफ पे तारीफ करत असताना स्वाभिमानी इरफान खान आपल्या जागेवर उभा राहिला आणि म्हणाला, आपकी फिल्मे फिल्मे होती है, तो क्या 'लंच बॉक्स' जैसी हमारी फिल्मे क्या वडापाव होती है? त्याचं म्हणणं ऐकून सभोवार ग्लॅमरस रुपात बसलेल्या चिकन्या चुपड्या अशा मेकअपचा थर असलेले चेहरे 'बघण्यासारखे' झाले. असं काही घडेल हे त्यांना अपेक्षित नसणार...

असो. वडापाव आणि फिल्मवाले अशीही एक नातेसंबंधांची एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील हीदेखील एक रंजक गोष्ट. म्हटलं तर नक्कीच जगावेगळी आहे.

---

# जलसंधारण : जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा भक्कम पाया



पाणी म्हणजे शेतीचा श्वास आणि विकासाचा आधार आहे. बदलते हवामान आणि घटती भूजल पातळी यामुळे जलसंधारणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करून तो जमिनीत मुरवणे, ही काळाची गरज आहे. जलसंधारणातून मातीला नवजीवन, शेतीला आधार आणि भावी पिढ्यांना सुरक्षित भविष्य देण्याची ताकद आहे.

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून त्यापैकी १७४.७३ लाख हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. राज्यातील २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकासासाठी पात्र असून त्यापैकी १८२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर मृद व जलसंधारणाची विविध कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित क्षेत्रावरही नियोजनबद्ध पद्धतीने कामे सुरू आहेत.

महाराष्ट्र शासनाने जलसंधारणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध प्रभावी योजना राबविल्या आहेत आणि राबवत आहे. राज्याला जलसुरक्षिततेच्या दिशेने सक्षमपणे पुढे नेण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग सातत्याने कार्यरत असून जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण, विकेंद्रित जलसाठ्यांची निर्मिती आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात आहे.

जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये जलसाठे वाढले, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा झाली आणि संरक्षित सिंचनाला चालना मिळाली. ज्या शेतकऱ्यांना पूर्वी वर्षातून एकच पीक घेता येत होते, अशा अनेक भागांत दुबार पिकांच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जलसंधारणामुळे निर्माण होणारे संरक्षित सिंचन केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण बाजारपेठ, रोजगार, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांनाही चालना देते.

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यशानंतर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत राज्यातील ५,८५८ गावांमध्ये सुमारे १.४३ लाखांहून अधिक कामे प्रस्तावित झाली आहेत. त्यापैकी १.२४ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण झाली आहेत. जुलै २०२६ अखेर या अभियानावर २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे.

गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार ही योजना पर्यावरण आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढते, तर तोच सुपीक गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होते.

२०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३,३०५ जलाशयांमधून ९८०.५० लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, तो सुमारे १ लाख ९३ हजार एकर क्षेत्रावर पसरविण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, ८१,११४ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. म्हणजेच जलसंधारण हे शेतीला केवळ पाणी देत नाही, तर जमिनीलाही नवजीवन देते.

भूजल पुनर्भरण हा जलसंधारणाचा अत्यंत महत्वाचा नैसर्गिक फायदा आहे. गेल्या काही दशकांत भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यामुळे अनेक भागांत विहिरी कोरड्या पडणे, बोअरवेलची खोली वाढणे आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा शेतीसोबतच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतो.

पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर भूजल संवर्धन आणि पुनर्भरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

जलसंधारणाचा पर्यावरणावरही अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. एखाद्या भागात पाणी टिकून राहिले, तर तेथील जैवविविधतेला आधार मिळतो. वृक्षसंवर्धनाला चालना मिळते, जमिनीतील ओलावा टिकतो आणि नैसर्गिक परिसंस्था मजबूत होण्यास मदत होते. अनेक ठिकाणी जलसंधारणाच्या कामांनंतर स्थानिक जैवविविधता आणि जलचरांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यामुळे जलसंधारण ही केवळ विकासाची योजना नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे.

आज हवामान बदल हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी आणि त्यानंतर दीर्घ काळ पावसाचा खंड असे चित्र अनेक भागांत दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ मोठी धरणे किंवा पारंपरिक सिंचन व्यवस्था पुरेशी ठरणार नाही.

गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. हवामान बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेचा विचार करून मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली आहे. आवश्यक दुरूस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर दिला जात आहे.

या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाची महत्वपूर्ण भूमिका आहे. विभागाच्या नव्या प्रशासकीय आकृतिबंधाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळाली आहे. मंजूर कामे मूळ आराखड्यानुसार व निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण कामांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून मालगुजारी तलावांच्या पुनरूज्जीवनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसंधारण अधिक परिणामकारक करण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये १४० प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या माध्यमातून सुमारे ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चालना देणारी विविध कामे सुरू आहेत. या योजनेचे एकूण प्रकल्पमूल्य १,२५१.११ कोटी रुपये असून, जुलै २०२६ अखेर सुमारे १,००३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे.

मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन, सिमेंट बंधारे, पाणलोट विकास, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण आणि लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या जलसंवर्धन उपक्रमांची प्रभावी सांगड घालत महाराष्ट्र जलसुरक्षिततेच्या दिशेने भक्कम वाटचाल करत आहे. नाला खोलीकरणाबरोबरच बांबू लागवडीसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांवरही भर देण्यात आला आहे. विदर्भातील मालगुजारी तलावांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा दृष्टिकोन केवळ पाणी साठविण्यापुरता मर्यादित नसून जलस्रोतांचे दीर्घकालीन संवर्धन सुनिश्चित करणारा आहे.

महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६दरम्यान जलसंधारण सप्ताह साजरा झाला, तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा महत्त्वाचा भाग म्हणून २१ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांत महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर आयोजित करण्यात आली. "माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा" हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे. नागरिक, युवक, विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांना या उपक्रमातून जलसंधारणाच्या लोकचळवळीशी जोडण्याचा प्रयत्न आहे.

युवकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देत त्यांना या लोकचळवळीशी डिजिटल माध्यमातून जोडण्यासाठी 'रील चॅलेंज' स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. माती संवर्धन, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या नाविन्यपूर्ण कल्पना समाजापर्यंत पोहचविण्यासाठी युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

जलसंधारण ही केवळ शासनाची योजना नाही, तर शासन आणि समाजाच्या सामूहिक सहभागातून यशस्वी होणारी लोकचळवळ आहे. शासन योजना आखू शकते, निधी उपलब्ध करून देऊ शकते, जलसंधारणाची कामे उभी करू शकते; पण त्या जलस्रोतांचे संवर्धन व पाण्याचा जबाबदारीने वापर करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे.


शासनाचे दूरदृष्टीचे धोरण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रभावी नेतृत्व, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे सहकार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर जलसमृद्ध, दुष्काळमुक्त आणि शाश्वत महाराष्ट्र घडविण्याचा आपला संकल्प अधिक दृढ होत आहे.

जलसंधारण दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव ठरू नये. तो प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनातील संकल्प बनला पाहिजे. घरातील पाणी असो, शेतातील पाणी असो किंवा गावातील जलस्रोत-प्रत्येक थेंब जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. चला, जलसंधारण दिनानिमित्त आपण सर्वजण संकल्प करूया, पाणी अडवूया पाणी जिरवूया, माती वाचवूया पाणी जपूया आणि जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्र घडवूया!

**-संजय राठोड,** मृद व जलसंधारणमंत्री

---

# थोर साहित्यिक विंदा करंदीकर



कवी, साहित्यिक, भाषांतरकार, निबंधकार अशा विविधांगांनी वावरणारे गोविंद विनायक करंदीकर उर्फ विंदा करंदीकर यांची आज जयंती. भारतातील ज्ञानपीठ हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे वि.स. खांडेकर आणि वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यानंतर विंदा मराठी साहित्यातील तिसरे साहित्यिक आहेत. भारतीय साहित्य क्षेत्रातील हा बहुमान खरंतर त्यांना केव्हाच मिळायला हवा होता, पण उशिराने का होईना त्यांचा योग्य तोच सन्मान झाल्याची प्रतिक्रिया साहित्य वर्तुळात उमटली.

विंदांचा जन्म २३ ऑगस्ट १९९८मध्ये सिंधुदुर्गमध्ये धालवली येथे झाला. ते कवी, लेखक, अनुवादक व समीक्षक होते. १९४९च्या मे महिन्यात विंदांच्या 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहात अंतर्भूत कवितांची सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक, प्रेमविषयक, बालजीवनविषयक, चिंतनात्मक, देवगड-राजापूरकडील बोलीभाषेतील कविता अशी वर्गवारी करता येऊ शकते. स्वेदगंगा कवितासंग्रहातून पुढील तीन कविता घेण्यात आल्या आहेत.

ज्येष्ठ विचारवंत एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानपीठ पुरस्कार निवड समितीची बैठक दिल्लीत पार पडली आणि लगेचच दुसऱ्या दिवशी याची अधिकृत घोषणा करण्यात आली. पाच लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 'रसिकांनी मला भरभरून प्रेम दिले. माझ्या दृष्टीने रसिकांचे प्रेम हाच खरा सन्मान आहे. पुरस्कार वगैरे उपचार असतात. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नाही, तर मराठी भाषा, कविता आणि काव्य परंपरेचा हा सन्मान आहे,' अशा शब्दांत विंदांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ नसतानाही वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा या तिघांनी काव्यवाचनाच्या जाहीर कार्यक्रमांचे अनेक फड रंगवले आहेत. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या 'स्वेदगंगा' पासून सुरू झालेला विंदांचा साहित्यिक प्रवास 'मृद्गंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' आदी काव्यसंग्रह; 'स्पर्शाची पालवी' आणि 'आकाशाचा अर्थ' हे दोन लघुनिबंधसंग्रह; ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'चा अर्वाचीनीकरणाचा अभिनव प्रयोग; 'परंपरा आणि नवता' हा मराठी समीक्षालेख संग्रह; फाऊस्ट, राजा लिअर आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र आदी अनुवादीत ग्रंथ.

'राणीचा बाग', 'एकदा काय झाले', 'सशाचे कान', 'एटू लोकांचा देश', 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ' हे काही बालकविता संग्रह. २००३ साली प्रकाशित झालेला 'अष्टदर्शने' या संग्रहापर्यंत येऊन पोहोचतो. 'अष्टदर्शने' या संग्रहात आठ तत्त्वज्ञांचे विचार त्यांनी सोप्या रचनांमध्ये मांडले आहेत. याच संग्रहाकरता त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. आशयगर्भित पण सोपी शब्दरचना करणारे विंदा आपल्या कवितांतून वैश्विक सत्य धुंडाळत राहिले. त्यांची कविता प्रयोगशील आहे. विंदांना विविध पुरस्कार तसेच साहित्य अकादमीची फेलोशिपही मिळाली. १४ मार्च २०१० रोजी त्यांचे निधन झाले.

(साभार : मराठी वर्ल्ड)

# औद्योगिक प्रकल्प उभारताना प्रकल्पग्रस्तांना प्रथम प्राधान्य देणार : खासदार सुनील तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

औद्योगिक प्रकल्प उभारताना रायगडचा विकास आणि स्थानिक नागरिक व प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांचे संरक्षण हेच आपले प्राधान्य असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू स्थायी समिती रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आली होती. त्याची माहिती देण्यासाठी शुक्रवारी (दि. २१) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदे खासदार सुनील तटकरे बोलत होते.

संसदेच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू स्थायी समितीच्या माध्यमातून ओएनजीसीच्या उरण प्रकल्पासह गॅलच्या उसर प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या समितीसमोर मांडण्यात आल्या. औद्योगिक प्रकल्प उभारताना स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये, अशी भूमिका खासदार तटकरे यांनी घेतली.



ओएनजीसी आणि गॅलचा सीएसआर निधी बाहेरील भागात खर्च न करता रायगडच्या विकासासाठी प्राधान्याने वापरावा, अशी मागणी त्यांनी केली. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांसाठी हा निधी प्रभावीपणे वापरण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ३०० खाटांचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू झाले असून वैद्यकीय महाविद्यालयाची पहिली बॅचही बाहेर पडल्याचे त्यांनी सांगितले. अलिबाग क्रीडा संकुलासाठी निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा सुरू असून रेवस-रेड्डी सागरी महामार्गालाही गती देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे तटकरे यांनी स्पष्ट केले.

अलिबागच्या भविष्यातील पाणी गरजेसाठी सांबरकुंड धरण प्रकल्प आवश्यक आहे, मात्र जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना भूसंपादन कायद्यानुसार योग्य व न्याय्य मोबदला मिळणे तितकेच महत्त्वाचे असून त्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली. राजकीय आरोपांवर बोलताना खासदार तटकरे यांनी आपण कधीही वैयक्तिक द्वेषाचे राजकारण केले नसल्याचे सांगितले. आरोप-प्रत्यारोपांपेक्षा विकास आणि जनहिताला प्राधान्य देणे हेच आपले धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रायगडमधील औद्योगिक प्रकल्प, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, आरोग्य, पाणी, क्रीडा आणि दळणवळणाच्या सुविधांसाठी भविष्यातही सातत्याने पाठपुरावा सुरू राहील. जिल्ह्याच्या हिताशी संबंधित कोणताही प्रश्न शासनाच्या पातळीवर प्रभावीपणे मांडण्यास आपण मागे हटणार नाही, असे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांना एफएफएस अॅपवरून खत खरेदी करण्याचे आवाहन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे रायगड जिल्ह्यातील शेतकरी आता तंत्रज्ञानाचा अवलंब करू लागले आहेत. त्यामुळे पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी आता एफएफएस अॅपवरून खत खरेदी करण्याचे आवाहन तालुक्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

रासायनिक खतांची उपलब्धता, ऑनलाइन बुकिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि शेतकरीहिताची करण्यासाठी कृषी विभागाकडून फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल ही ऑनलाइन खत विक्री प्रणाली सुरू केली आहे. खतांचा साठा उपलब्ध आहे की नाही याची खातरजमा करण्यासाठी शेतकऱ्यांना यापूर्वी विविध कृषी केंद्रांवर वारंवार जावे लागत होते. त्यामुळे त्यांचा वेळ आणि खर्च वाया जात होता. नवीन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना आपल्या मोबाईलवरूनच आवश्यक खतांची उपलब्धता तपासून जवळच्या कृषी केंद्रातील विक्रेत्याकडे खताचे बुकिंग करता येणार आहे.

यामध्ये युरिया, डीएपी, सुफला तसेच इतर खतांचा समावेश आहे.शेतकऱ्यांनी मोबाईलवर फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल हे अॅप्लिकेशन डाउनलोड करावे. स्मार्टफोनची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांना जवळच्या अधिकृत खत विक्रेत्याकडे बुकिंग करता येणार आहे. बुकिंगसाठी शेतकरी आयडी, आधार क्रमांक तसेच जमीन व पिकांची आवश्यक माहिती उपलब्ध असणे गरजेचे आहे. बुकिंगनंतर मिळालेला क्यूआर कोड अथवा टोकन क्रमांक दोन दिवसांसाठी वैध राहणार आहे.

या कालावधीत खताची खरेदी न झाल्यास पुन्हा बुकिंग करता येणार आहे. शेतकऱ्याला स्वतः खत घेण्यासाठी उपस्थित राहता येत नसल्यास त्याच्या वतीने अधिकृत प्रतिनिधीलाही खत घेता येणार आहे. तालुक्यामध्ये खतांची उपलब्धता कायम राहावी आणि कोणत्याही भागात खताची कमतरता भासू नये, यासाठी कृषी विभागाने नियोजन केले आहे.

नवीन प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी तसेच खत विक्रेत्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी कृषी विभागातील अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पोलादपूर यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन वैशाली फडतरे यांनी केले आहे.

# मुरूडमध्ये भात लावणी १०० टक्के पूर्ण : समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात यंदा समाधानकारक पाऊस पडल्यामुळे भात लावणी अखेरच्या टप्प्यात आली आहे. दमदार पावसामुळे खारपट्ट्यात तसेच सखल भागातील शेती लावण्यात शेतकरी वर्ग जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून व्यस्त दिसून येत होता. तालुक्यात बहुतेक भात लावणीचे काम पूर्ण झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

यंदा पावसाने ओढ दिल्याने धूळ पेरणी वाया गेली. दुबार पेरणीचे संकट ओढवले. पावसाचे प्रमाण कमी-अधिक झाल्याने बहुतांशी शेतकऱ्यांना रोहू पद्धत वापरावी लागली. मात्र खताचा कितीही मारा केला तरी धूळ पेरणीतून रोपांची होणारी वाढ, त्यातून मिळणारा नायट्रोजन याची सर रोहू पद्धतीला येत नसल्याचा प्रत्यय यंदा शेतकऱ्यांनी घेतल्याची चर्चा आहे. गतवर्षी मुरुड तालुक्यात १५ जुलैपर्यंत भात लागवड पूर्ण झाली होती. यंदा मात्र पावसाच्या अनियमितपणामुळे ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत भात लागवड केली गेली.

आतापर्यंत २०८० मि.मी. इतकी पावसाची नोंद झाली असून अद्याप आणखी पावसाची अपेक्षा व्यक्त होत आहे.मुरुड तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र असून या क्षेत्रामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत व खारपट्यातील जमिनीवर पनवेल इत्यादी भाताच्या जातींची लागवड करत आहेत. यंदा अधिकाधिक शेतकऱ्यांना धूळ पेरणी वाया गेल्यामुळे पर्यायी मार्ग म्हणून रोहू पद्धतीने भात पिकाच्या रोपवाटिकेची पेरणी करावी लागली. प्रामुख्याने यामध्ये भात बियाणे



२४ तास पाण्यामध्ये भिजवून मोड आल्यानंतर शेतामध्ये चिखलणी करून त्यावर बियाणांची पेरणी करून रोपवाटिका तयार केल्या जातात.

शेतकऱ्यांनी रोहू पद्धतीने पेरणी करून सुरुवातीच्या काळात भात खाचरातील पाण्याचा पूर्णपणे निचरा होईल याची काळजी घेतली आहे. तसेच चिमणी, पक्षी भाताचे बियाणे खाऊ नये म्हणून स्वतः तेथे उपस्थित राहून संरक्षण केले आहे. परिणामी भात रोपवाटिका चांगल्या पद्धतीने तयार होत आहेत, अशी माहिती कृषी विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांनी दिली.भात लावणीच्या कामात दरवर्षीप्रमाणे यंदाही मजुरांची टंचाई भासली. ग्रामीण भागात ही समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहे. खरीप हंगामातील भात हे एकमेव पीक असल्यामुळे लावणीसाठी पटेल वा रोजंदारीवर महिला शेतात राबताना दिसत होत्या. नांगरणीसाठी जोडीला १ हजार रुपये, तर पुरुषांना ६०० रुपये आणि महिलांना ३०० ते ४०० रुपये मजुरी द्यावी लागते.कृषी कार्यालयाकडून ग्रामपंचायतनिहाय भात लागवडीच्या सगुणा राईस टेक्निक (एसआरटी) व चारसूत्री भात लागवडीचे प्रयोग प्रात्यक्षिकाद्वारे केले जातात. सगुणा पद्धतीत नांगरणीचा खर्च वाचत असल्याने शेतकऱ्यांकडून या पद्धतीला अधिक पसंती मिळत असली तरी पारंपरिक पद्धतीने बहुतांशी शेती लावण्याचा प्रघात दिसतो.

यांत्रिक पद्धतीने भात लागवडीसाठी शेतकरी पुढे येत असला तरी हे प्रमाण नगण्य आहे. कृषी विभाग प्रतिवर्षी प्रात्यक्षिके घेत असतो, परंतु अत्यल्प भूधारक असल्याने १० ते २० गुंठे भात क्षेत्रासाठी ही पद्धत लाभदायी नसल्याचे सांगितले जाते. मुरुड तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी सांगितले की, सहाय्यक कृषी अधिकारी यांच्यामार्फत क्षेत्रीय स्तरावर प्रत्येक गावामध्ये जाऊन शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया, घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी प्रात्यक्षिक घेण्यात आले. तसेच भात रोपवाटिका व्यवस्थापन, माती परीक्षण अहवालावर आधारित खत व्यवस्थापन, भात शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर तसेच गिरीपुष्पसारख्या हिरवळीच्या खतांचा वापर, कृषी विभागामार्फत कीड व रोग सर्वेक्षण सल्ला प्रकल्प क्रॉपसॅप अंतर्गत भात पिकाच्या शेतीशाळा घेण्यात येत आहेत.

याद्वारे शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व आदी गोष्टींची माहिती दिली जाते. भात पिकाच्या लागवडीच्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी प्रात्यक्षिक आणि माहिती देण्यात आली. व्हीबी-जी रामजी फळबाग लागवड, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, जलकुंड, ठिबक सिंचन इत्यादी योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी केले आहे.

# तळा येथील बाजारपेठेत रंगीबेरंगी राख्यांची आवक

**तळा : प्रतिनिधी**

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीसाठी महत्त्वाचा असलेला पवित्र सण आता अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. यानिमित्ताने बहिणींची बाजारात राख्या खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. तळा शहरात गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या प्रकारच्या राख्यांची आवक महिलांच्या मागणीनुसार वाढताना दिसत आहे. शेकडो प्रकारच्या आकर्षक राख्या तळा बाजारपेठेतील दुकानांमध्ये दिसत असून महिला वर्गाची राख्या खरेदीसाठी मोठी गर्दी होताना पाहावयास मिळत आहे.

या राख्यांमध्ये महिला वर्ग साध्या धाग्याच्या आणि रेशमी धाग्याच्या राख्या खरेदी करताना मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळत आहे. राख्यांमध्ये गोंड्याची राखी, रेशमी धाग्याच्या, साध्या धाग्याच्या, ज्वेलरी पॅटर्न, जरीकाम इत्यादी त्याचबरोबर लहान मुलांसाठी मिकी माऊस, श्री हनुमान, बाळ गणेश, झगमग लाईटवाल्या इत्यादी राख्यादेखील आता उपलब्ध झाल्या आहेत. काही दिवसांवर रक्षाबंधन आल्याने काही



बहिणींचे भाऊ नोकरी आणि व्यवसायानिमित्त बाहेर आहेत, त्या भावांना बहिणी आता पोस्टाने राख्या पाठवत आहेत. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या हातावर राखी बांधते तेव्हा ती त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करत असते, तर भाऊदेखील बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देत असतो.

# कारच्या धडकेत सवाद येथील पत्रकाराचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

अपूर्ण म्हाप्रळ-भोर ते पंढरपूर मार्गावरील एका पुलाच्या बांधकामासाठी केलेल्या पर्यायी रस्त्यावर स्विफ्ट कारची स्कूटरला समोरासमोर धडक बसून झालेल्या भीषण अपघातात पोलादपूर तालुक्यातील सवाद येथील पत्रकार आमीर तारलेकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात स्कूटरवरील आमीर तारलेकर यांचे भाऊ गंभीररीत्या जखमी झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



महाड व पोलादपूर तालुक्याच्या सीमेवरील म्हाप्रळ-भोर ते पंढरपूर मार्गावर गेल्या काही वर्षांपासून रस्त्यासह पुलांचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघातांचे सत्र कायम आहे. शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आमीर शौकत तारलेकर आणि त्यांचा भाऊ शब्बीर तारलेकर हे दोघेही सुझुकी बर्गमन स्कूटर (क्र. एमएच ०६ - सीई २३३५) वरून सवाद येथील घराकडे परतत असताना महाड तालुक्यातील भोराव फाट्याजवळ असलेल्या एका अपूर्ण पुलानजीकच्या पर्यायी रस्त्यावर भोरच्या दिशेने समोरून स्विफ्ट कार (क्र. एमएच २४ बीआर ८३७२) भरधाव वेगाने आल्याने दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक बसली.

या अपघातात पत्रकार आमीर तारलेकर यांचा जागीच मृत्यू झाला, तर स्कूटरवर मागे बसलेले त्यांचे भाऊ शब्बीर तारलेकर गंभीर जखमी झाले. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून स्विफ्ट कार चालक गणेश धन्यकुमार देवकाते (रा. सोलापूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सवाद येथील निवासस्थानी त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी कोकणातील अनेक समाजबांधव, पत्रकार, विविध खात्यांचे अधिकारी, बहुजन समाजातील मान्यवर तसेच सप्तक्रोशीतील अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबा नदीपात्रात आढळला बेपत्ता तरुणाचा मृतदेह

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथून शुक्रवारी (दि. २१) बेपत्ता झालेल्या रविराज माणिक साळुंखे (२७, मूळ रा. सातारा, सध्या रा. नागोठणे) या तरुणाचा मृतदेह शनिवारी (दि. २२) बाळसई गावाच्या हद्दीत अंबा नदीपात्रात आढळून आला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रविराज साळुंखे हा नागोठणेजवळील आमडोशी येथील सुप्रिम पेट्रोकेम लिमिटेड कंपनीच्या प्रॉडक्शन विभागात कामगार म्हणून कार्यरत होता.



शुक्रवारी तो नागोठणे येथील आपल्या घरातून बाहेर पडल्यानंतर घरी परतला नाही. त्यामुळे त्याच्या कुटुंबीयांनी नागोठणे पोलीस ठाण्यात माहिती दिल्यानंतर मिसिंग रजिस्टर क्रमांक १८/२०२६ अशी नोंद करण्यात आली होती. त्यानंतर नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि. रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी रविराजचा शोध सुरू केला. शनिवारी बाळसई गावाच्या हद्दीत अंबा नदीपात्रात वाकण पुलाखाली बाळसईच्या बाजूला रविराज साळुंखेचा मृतदेह आढळून आला.

मृतदेहाची ओळख रविराजचा भाऊ दीपक साळुंखे यांनी केली. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# जि.प. शाळा चरई-दहिवली येथे वह्यावाटप



**तळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा चरई-दहिवली येथे पारिजात संस्थेच्या वतीने बॅक टू स्कूल मोहिमेअंतर्गत मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी दिलीप महाडिक, विठोबा लाड, बाबू महाडिक, किशोर तांबे, सुधीर महाडिक, सौरक्षणा तांबे, दीक्षा तांबे, पोलीस किरण महाडिक, मुख्याध्यापक धनंजय पवार, अंगणवाडी सेविका ज्योती केंबळे, करुणा दिवेकर, जान्हवी महाडिक, पूनम पवार, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, महिला आदी उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी विद्यार्थ्यांना बॅग, कंपासपेटी, वह्या आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्य वाटपामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता तसेच त्यांना आता शिक्षणातदेखील मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. पारिजात संस्थेने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केल्याने शाळा व ग्रामस्थांच्या माध्यमातून त्यांचे आभार मानण्यात आले.

# 'शेतकरी मित्र' निवडीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आत्मा योजनेंतर्गत सन २०२६-२७ करिता शेतकरी मित्र निवडीसाठी अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत आत्मा योजनेंतर्गत सन २०२६-२७करिता तळा तालुक्यात शेतकरी मित्रांची निवड करण्यात येणार आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तालुक्यातील मंजूर १२ सहाय्यक कृषी अधिकारी सजा/कार्यक्षेत्रनिहाय एक शेतकरी मित्र अशा एकूण १२ शेतकरी मित्रांची निवड करण्यात येणार आहे. शेतकरी मित्राचे कार्यक्षेत्र हे संबंधित सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र राहील. एकूण १२ शेतकरी मित्रांच्या निवडीमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ३० टक्के महिला सहभाग सुनिश्चित करण्यात येणार असून त्यामध्ये चार महिला शेतकरी मित्रांची निवड करण्यात येईल.

दरम्यान, उमेदवाराचे वय किमान २५ वर्षे आणि कमाल ६० वर्षे असावे. उमेदवार हा संबंधित सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांच्या तळा तालुक्यातील कार्यक्षेत्रातील गावातील रहिवासी व शेतकरी असावा. उमेदवार किमान १२वी उत्तीर्ण असावा. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २७ ऑगस्ट आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, **मौजे गूळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड** येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकतीचे मालक **श्री. मोहन प्रभाकर जोशी** यांची मालकीची व ताबेकब्जामध्ये असलेली मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मौजे गूळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे. आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|
| १३९/२/अ | ०.१२.१० पैकी ०.०५.०० | १.१६ |

सबब सदरह वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कूळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर दाखल कराव्यात.

विहित मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : मोहोपाडा
दिनांक: २३.०८.२०२६

**सही/-**
**योगेश अरुण मानकवळे**
ॲडव्होकेट हायकोर्ट
पत्ता: नवीन पोसरी, पो. मोहोपाडा

# नमुंमपा सभेत जलसंधारणाची प्रतिज्ञा

**नवी मुंबई : बातमीदार**



२१ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण राज्यात 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा केला जातो. तसेच १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' पाळला जातो. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही जलसंधारण दिनाचे औचित्य साधून राजमाता जिजाऊ सभागृहात सर्वसाधारण सभेप्रसंगी सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

यावेळी महापौर सुजाता पाटील यांनी जलसंधारण दिनाचे महत्त्व सांगत व्यासपीठावर उपस्थित अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्यासह सर्व पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, पत्रकार यांच्यासह जलसंधारणाची प्रतिज्ञा ग्रहण केली. प्रत्येकाने आपल्या परीने जलसंधारणासाठी जागरूक प्रयत्न घेण्याचे आवाहनही महापौर महोदयांनी केले.

माजी मुख्यमंत्री व जलतज्ज्ञ सुधाकरराव नाईक यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश प्रसारित करीत राज्यातील जलसंधारण कार्याला गती दिली. त्यास अनुसरून पाण्याचे दुर्भिक्ष्य टाळण्यासाठी आणि भूजल पातळी वाढवण्यासाठी जनजागृती करणे, जलसंधारणाच्या कामांमध्ये जनसहभाग वाढविणे तसेच मृद व जलसंधारणाचे महत्त्व तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणे ही उद्दिष्टे प्रसारित करण्यासाठी जलसंधारण सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असते.

नवी मुंबई महानगरपालिकेनेही जलसंधारण सप्ताह अंतर्गत ठिकठिकाणी बॅनर्स लावून तसेच डिजिटल होर्डिंगद्वारे या मोहिमेचा प्रसार केला. महापालिका मुख्यालयासह सर्व जलकुंभाच्या ठिकाणी जलसंधारणाची शपथ घेण्यात आली.

"माझ्या देशाच्या आणि राज्याच्या शाश्वत विकासासाठी पाणी व मातीचे संवर्धन करणे हे माझे कर्तव्य समजेन. मी माझ्या दैनंदिन जीवनात पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करेन. पाण्याचा अपव्यय होणार नाही याची पूर्ण काळजी घेईन. पावसाचे पाणी अडवणे, जिरवणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे रक्षण करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. माझ्या परिसरात व समाजामध्ये पाण्याचे महत्त्व पटवून देऊन जलसाक्षरतेमध्ये भर घालीन, असा संकल्प मी आज करत आहे," अशा शब्दांत ही शपथ घेण्यात आली.

# संसदीय कमिटीच्या खासदारांची उरण ओएनजीसी प्रकल्पाला भेट

**उरण : प्रतिनिधी**



पेट्रोलियम अँड नॅचरल गॅस संसदीय स्टॅण्डिंग कमिटीच्या ११ खासदारांनी शुक्रवारी (दि. २१) उरण येथील ओएनजीसी प्रकल्पाची पाहणी केली. प्रकल्पात वारंवार घडणाऱ्या तेल-गॅस गळती, आग, स्फोटासारख्या घटनांबाबत कमिटीने चिंता व्यक्त करत अशा गंभीर घटना भविष्यात घडणार नाहीत याची दक्षता घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पेट्रोलियम अँड नॅचरल गॅस संसदीय स्टॅण्डिंग कमिटीने शुक्रवारी उरण येथील ओएनजीसी प्रकल्पाचा अभ्यास दौरा केला. कमिटीचे सभापती सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या दीड-दोन तासांच्या अभ्यास दौऱ्यात ११ खासदार सहभागी झाले होते. कमिटीच्या ११ खासदारांनी प्रकल्पाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. यानंतर कमिटीने रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, उरण ओएनजीसी मुख्य प्रकल्प अधिकारी अरुण कुमार सिंह, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पेट्रोलियम क्षेत्रावर जागतिक भू-राजकीय परिस्थितीचा प्रभाव व इतर विविध विषयांवर चर्चा केली.

अशा प्रकारच्या गंभीर घटना प्रकल्पात भविष्यात घडणार नाहीत याची दक्षता घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचनाही कमिटीने ओएनजीसी अधिकाऱ्यांना दिल्या असल्याचे कमिटीचे सभापती खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी सांगितले.

# भारतीय बंदर कामगार संघाच्या तूतीकोरिनमधील नवीन कार्यालयाचे उद्घाटन



**उरण : प्रतिनिधी**

भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीच्या निमित्ताने तूतीकोरिन येथील भारतीय बंदर कामगार संघाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. महासंघाचे प्रभारी चंद्रकांत (अण्णा) धुमाळ यांच्या हस्ते नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रमास पोर्ट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीकांत राय, महासचिव सुरेश पाटील, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत तसेच महासंघाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भारतीय बंदर कामगार संघ महासचिव एस. सुरेश आणि अध्यक्ष मुगास्वामी यांच्यासह संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जेएनपीएचे लेबर ट्रस्टी रवी पाटील यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास के. के. विजयन, गोपी पटनायक, संजय धंडाळ, विघ्नेश नायक, प्रभाकर उपरकर, वेंकप्पा नायक, श्रेया शेलके, विजयालक्ष्मी, विशाखा मांजरेकर, दीपक जाधव, सुधीर तिवरेकर यांच्यासह देशातील विविध प्रमुख बंदरांमधील महासंघाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

नवीन कार्यालय हे संघटनेच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी यावेळी व्यक्त केला. ते म्हणाले की, या नवीन कार्यालयाच्या माध्यमातून कामगारांच्या समस्या अधिक प्रभावीपणे मांडता येतील. संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या हक्कांसाठी आणि कल्याणासाठी अधिक संघटितपणे काम करता येईल.



# दिनेश शुक्ला यांना आदर्श उद्योजक सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी-कोन रस्त्यावरील सोमाटणे येथील शिवगंगा वॉटर पार्कचे संचालक दिनेश आवधनारायण शुक्ला यांना रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते आदर्श उद्योजक सन्मानाने गौरविण्यात आले. त्यांच्या उद्योजकीय कार्यासोबतच सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

उद्योजकते सोबतच शुक्ला यांनी सामाजिक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेली अनेक वर्षे ते आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, गरजू नागरिकांना विविध वस्तूंचे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण तसेच गोरगरीब कुटुंबांना किराणा सामान आणि वेळप्रसंगी आर्थिक मदत करीत आहेत.

# मोफत नेत्रतपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आर. झुंझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन सरपंच उमा संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली.

शिबिरात एकूण ५६ नागरिकांनी मोफत नेत्रतपासणीचा लाभ घेतला. तपासणीदरम्यान ११ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. या रुग्णांना पुढील उपचारासाठी शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल येथे नेण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष देवेंद्र महिंद्रकर यांच्या हस्ते उपस्थित पाहुणे, नेत्रतपासणीसाठी आलेले डॉक्टर तसेच हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी रोटरीयन सरपंच उमा मुंढे यांनी रोटरी क्लबच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून क्लबच्या पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटरीयन गणेश काळे यांनी केले, तर रोटरीयन सचिव नागेश कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले. रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा अध्यक्ष देवेंद्र महिंद्रकर, सचिव नागेश कदम, सर्व्हिस प्रोजेक्ट चेअरमन गणेश काळे, फर्स्ट लेडी डॉ. प्रतिभा महिंद्रकर, सुशांत उचील, डॉ. लेखा उचील, वर्षा पाटील, शारदा काळे उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना मोफत नेत्रतपासणी तसेच गरजू रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा मिळाल्याने रोटरी क्लबच्या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**



रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे येथील विद्यार्थ्यांना वाणिज्य क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींची माहिती मिळावी आणि त्यांच्या भविष्यातील करिअरची योग्य दिशा ठरविता यावी, या उद्देशाने CAFY आणि सुपर मेगा करिअर कौन्सिलिंग प्रोग्राम -भविष्याची वाटचाल या विशेष करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) यांच्या करिअर समुपदेशन उपक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास सुमारे १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना वाणिज्य, सीए, सीएमए, एमबीए, वित्त आणि स्टॉक मार्केटसह विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांमधील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सीए सुप्रिया सामंत यांनी विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, वित्तीय क्षेत्र तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील करिअरच्या संधींबाबत कोर्स व त्याची तयारी, प्रवेश परीक्षा याची सविस्तर माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी करिअरविषयक विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य आमोद ठक्कर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरची निवड करताना योग्य नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करण्याचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य संदीप घोडके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे नियोजन भूषण ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रांजल भोईर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रियांका ठाकूर, दिक्षिता म्हात्रे, तन्वी कोळी, रेणू सरोज आणि ऋतुजा म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता सीए, सीएमए, एमबीए, फायनान्स, स्टॉक मार्केट तसेच इतर व्यावसायिक क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधींची जाणीव करून देणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक प्रतिसाद यामुळे भविष्याची वाटचाल हा करिअर मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

# दुर्गम भागातील ५०० विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेला 'प्रायमा रसायनी २०२६ मेगा हेल्थ चेकअप कॅम्प' उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत चार मुख्य केंद्रांअंतर्गत येणाऱ्या १७ जिल्हा परिषद शाळांमधील तब्बल ५०० विद्यार्थ्यांची मोफत व सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली.

शाळेतील विद्यार्थ्यांची UDISE+ आणि Student Portal वर रक्तगटाची माहिती भरणे आवश्यक असते. मात्र अनेक विद्यार्थ्यांकडे रक्तगटाची अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने केंद्रप्रमुख व शिक्षकवृंदांनी प्रायमा रसायनीकडे रक्तगट तपासणीसह आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्याची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत प्रायमा रसायनीने व्यापक आरोग्य तपासणी मोहीम राबवली.

या आरोग्य शिबिरात तब्बल ५० तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने तसेच प्रयोगशाळेने योगदान देत विद्यार्थ्यांची विविध प्रकारची तपासणी केली. यामध्ये रक्तगट तपासणी करून विद्यार्थ्यांच्या आपत्कालीन वैद्यकीय नोंदींसाठी अचूक माहिती उपलब्ध करून देण्यात आली. तसेच हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासून रक्तक्षयाची संभाव्य लक्षणे असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य आहार व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांची खरूज व इतर त्वचाविकारांची तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी तत्काळ औषधोपचार करण्यात आले. तसेच जंत निर्मूलनासाठी आवश्यक तपासणी करून विद्यार्थ्यांना जंतनाशक औषधांचे वाटप करण्यात आले. दुर्गम व अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना वेळेत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि लहान वयातच आरोग्यविषयक समस्या ओळखून त्यावर योग्य मार्गदर्शन मिळावे, या सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने या मेगा हेल्थ चेकअप कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

प्रायमाच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध झाल्याने केंद्रप्रमुख, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांनी आभार मानले. ५० डॉक्टर आणि प्रयोगशाळेच्या पथकाने दिलेले योगदान तसेच उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# फ्रँकफिनची राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी

## टीएचएससी कनेक्ट २०२६मध्ये तीन पुरस्कारांनी सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



फ्रँकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग या जगातील क्रमांक एक एअर होस्टेस ट्रेनिंग इन्स्टिट्यूट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेने पुन्हा एकदा उल्लेखनीय कामगिरी करत नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे २० ऑगस्ट रोजी आयोजित टीएचएससी कनेक्ट २०२६ परिषदेत तीन प्रतिष्ठित ट्रेनिंग पार्टनर अवॉर्ड पटकावले आहेत.

ट्रॅव्हल, टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी स्किल कौन्सिल (टीएचएससी)कडून प्रशिक्षण भागीदार म्हणून गौरवण्यात आले. द पॉवर ऑफ पार्टनरशिप्स या संकल्पनेवर आधारित या परिषदेत फ्रँकफिनला सर्वाधिक प्रशिक्षण केंद्र संलग्नता, सर्वाधिक खासगी अर्थसहाय्यित अल्पकालीन प्रशिक्षण आणि ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्समध्ये सर्वाधिक नोंदणी या तीन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांच्या माध्यमातून विमान वाहतूक आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील कौशल्य विकास व प्रशिक्षणासाठी फ्रँकफिनच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेण्यात आली.

टीएचएससीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजन बहादूर यांच्या हस्ते हे पुरस्कार फ्रँकफिन ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर मल्होत्रा यांनी स्वीकारले. यावेळी उद्योग क्षेत्रातील मान्यवर, सरकारी प्रतिनिधी आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. टीएचएससीसोबत फ्रँकफिनचे दीर्घकाळापासूनचे संबंध आहेत. यापूर्वीही फ्रँकफिनला टीएचएससीकडून बेस्ट ट्रेनिंग पार्टनर अवॉर्ड तब्बल पाच वेळा मिळाला आहे. २०१७-१८, २०१८-१९, २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४. विशेष म्हणजे २०२२-२३ मध्ये फ्रँकफिनला एकाच वर्षात तीन पुरस्कार मिळाले होते आणि २०२६मध्ये पुन्हा एकदा संस्थेने ही कामगिरी केली आहे. हे पुरस्कार भारतभरातील फ्रँकफिनच्या प्रशिक्षण केंद्रांमधून दिल्या जाणाऱ्या उच्च दर्जाच्या प्रशिक्षणाची साक्ष देतात.

देशातील लहान शहरे आणि गावांमधील विद्यार्थ्यांपर्यंतही दर्जेदार विमान वाहतूक आणि हॉस्पिटॅलिटी शिक्षण पोहोचवण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. १९९३ मध्ये स्थापन झालेल्या फ्रँकफिनने २०२६मध्ये आपल्या कार्याची ३३ वर्षे पूर्ण केली असून आगामी काळात आणखी विस्तार करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केल्या आहेत. फ्रँकफिनने एअर इंडियासोबत भागीदारी करून विद्यार्थ्यांना केबिन सर्व्हिसशी संबंधित सखोल परिचयात्मक प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना एअर इंडियासोबत संयुक्त प्रमाणपत्र दिले जाते, ज्यामुळे त्यांच्या व्यावसायिक पात्रतेला अधिक बळकटी मिळते.

प्रोजेक्टर व ऑडिओ-व्हिज्युअल साधनांनी सुसज्ज संगणक प्रयोगशाळा तसेच व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणाऱ्या आधुनिक वर्गखोल्यांचा समावेश आहे. अनुभवी प्रशिक्षकांकडून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच विमान कंपन्या, हॉटेल्स आणि ट्रॅव्हल उद्योगात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या आघाडीच्या संगणकीकृत आरक्षण प्रणालींचेही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. फ्रँकफिनचे सर्व अभ्यासक्रम नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी स्किल कौन्सिल यांच्याशी संलग्न आहेत. त्यामुळे संस्थेचा अभ्यासक्रम राष्ट्रीय कौशल्य विकासाच्या मानकांनुसार असल्याची खात्री होते. वर्षभरातच फ्रँकफिनच्या १०,०००हून अधिक विद्यार्थ्यांना विमान वाहतूक, हॉस्पिटॅलिटी, ट्रॅव्हल आणि कस्टमर सर्व्हिस क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

# युईएस कॉलेजमध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**उरण : वार्ताहर**

यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी येथे दि. १८ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२६ दरम्यान आयोजित केलेला पाच दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला. हा कार्यक्रम नागरी संरक्षण दल, उरण यांच्या सहकार्याने यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीच्या एन.एस.एस. विभागातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमाला शशिकांत शिरसाट, सहाय्यक उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल, हरेश्वर ठाकूर केंद्र सरकार कांस्यपदक विजेते, विभागीय वॉर्डन, उरण तालुका, समीर थळी माजी मानद अधिकारी, उरण व नागरी संरक्षण दलाचे सदस्य तसेच सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मीनाक्षी गुप्ता, विभाग प्रमुख, प्राध्यापकवर्ग व एन.एस.एस. विभागाच्या कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

या पाच दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेण्यात आले. जसे की प्रथमोपचार, जखम आणि रक्तस्राव (पट्टी बांधणे - सिद्धांत व प्रत्यक्ष कृती), अग्निशमन यंत्राचा वापर, सापांची ओळख, सर्पदंश (प्रतिबंध आणि उपचार), श्वास कोंडणे व कृत्रिम श्वासोच्छ्वास, आपत्कालीन बचाव पद्धती, स्ट्रेचर हाताळणे, उपलब्ध साधनांचा वापर करून उपाययोजना आदी माहिती देण्यात आली.




## रिमझिम श्रावण

रेशमी हिरवा शालू लेवून
रिमझिम बरसत आला श्रावण!
टप-टप कौलावरचे पाणी
छम-छम करती जणू अंगणी!

सप्तरंगांची करीत उधळण!
रिमझिम बरसत आला श्रावण!
झुळ-झुळ झुळ-झुळ वारा येई,
मयूर वनात नाचे थुई थुई
कण-कण सृष्टीचा गेला न्हाऊन!

रिमझिम बरसत आला श्रावण!
किल-बिल किल-बिल पक्षी गाती
मेघ मल्हार गुंजन करती
समीर करितो वीणा वादन!

रिमझिम बरसत आला श्रावण!
सळ-सळ डोलते शेत पाचुचे
खळखळ जीवन हे सोन्याचे!
अमोल ठेवा मनी साठवीन
रिमझिम बरसत आला श्रावण!!



-अभिजीत बोरुकर,
नवीन पनवेल

# नागोठण्यातील पूरग्रस्तांना नुकसानभरपाई द्या

## आमदार रविशेठ पाटील यांचे तहसीलदारांना निर्देश

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे परिसरातील पूरग्रस्त व्यापारीवर्गाला शासनाकडून मंजूर होणारी नुकसानभरपाई मिळण्यास होत असलेल्या दिरंगाईच्या पार्श्वभूमीवर भाजप व्यापारी सेल दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष सचिन मोदी आणि भाजप रोहा तालुका महामंत्री आनंद लाड यांनी स्थानिक आमदार रविशेठ पाटील यांची पेण येथील निवासस्थानी भेट घेऊन कैफियत मांडली.

यावेळी व्यापाऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यास प्रशासनाकडून होत असलेला विलंब, वारंवार मागविण्यात येणारी कागदपत्रे तसेच तलाठी कार्यालयात सतत जाण्याचा व्यापाऱ्यांना होणारा त्रास याबाबत सचिन मोदी यांनी आमदार रविशेठ पाटील यांचे लक्ष वेधले.

व्यापाऱ्यांची समस्या ऐकून घेतल्यानंतर आमदार रविशेठ पाटील यांनी तत्काळ रोहा तहसीलदार किशोर देशमुख यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नागोठण्यातील पूरग्रस्त व्यापाऱ्यांच्या नुकसानभरपाईबाबत



विचारणा केली. व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून त्यांना शासनाची नुकसानभरपाई मिळवून देण्याचे निर्देश त्यांनी तहसीलदारांना दिले.

यावेळी तहसीलदार किशोर देशमुख यांनी आमदारांना माहिती देताना नागोठण्यातील व्यापाऱ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नसून शासनाच्या नियमानुसार काही कागदपत्रे अपूर्ण असल्याचे सांगितले.

यावर भाजप व्यापारी सेलचे जिल्हाध्यक्ष सचिन मोदी यांनी महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. व्यापाऱ्यांकडून आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे एकाच वेळी मागविण्याऐवजी वारंवार वेगवेगळी कागदपत्रे मागविली जात असल्याने व्यापाऱ्यांना त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

पूरामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत त्यांना तातडीने मदतीची गरज आहे. नुकसानभरपाई वितरणासाठी निश्चित तारीख जाहीर करून व्यापाऱ्यांना त्वरित मदत द्यावी. आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे एकदाच मागवावीत, अशी मागणी सचिन मोदी यांनी केली तसेच याबाबत आमदार रविशेठ पाटील यांच्यासमवेत मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे मोदी यांनी सांगितले.

### व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा; अन्यथा आंदोलन -सचिन मोदी

नागोठण्यातील पूरग्रस्त व्यापाऱ्यांना नुकसानभरपाई मिळेपर्यंत आपण शांत बसणार नाही. प्रशासनाने प्रश्न सोडविण्यास दिरंगाई केल्यास व्यापाऱ्यांच्या हक्कासाठी प्रसंगी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सचिन मोदी यांनी दिला. दरम्यान, तलाठी कार्यालयात कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी व्यापाऱ्यांना वारंवार चकरा माराव्या लागत असून त्यामुळे वेळ व पैसा दोन्ही खर्च होत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. पूरग्रस्त व्यापाऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

# मुरूड एसटी डेपोमध्ये हिरकणी कक्ष



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड एसटी डेपोमध्ये महिलांना प्रवासादरम्यान आपल्या बाळाला सुरक्षित आणि आरामदायी वातावरणात स्तनपान करता यावे यासाठी महाराष्ट्र शासनाने हिरकणी कक्ष उपलब्ध करून दिला आहे. हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन मुरूड तालुका प्रवासी संघटनाचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी कक्षाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना केले.

या कार्यक्रमास कुणाल सतविडकर, अरविंद गायकर, आगार व्यवस्थापक चिन्मय अंबावकर, प्रकाश दांडेकर, विशाल कोलवणकर, माझीद हुसेनी, मंगेश पाटील, समिधा मुकादम, आशपाक जमादार, चंद्रकांत कारभारी, दिलीप पुगावकर, शाईश कारभारी, अक्षय भोईर आदींसह महिलावर्ग उपस्थित होता. या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

सुर्वे पुढे म्हणाले की महिलांच्या गरजा लक्षात घेऊन चांगल्या दर्जाचे आणि उपयुक्त असे हिरकणी कक्ष स्थापन केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मनःपूर्वक आभार. एसटीने प्रवास करणाऱ्या माता, विशेषतः लहान बाळांसह प्रवास करणाऱ्या महिलांसाठी ही सुविधा मोठा दिलासा देणारी ठरणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये महिलांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या मातृत्वाच्या गरजांचाही विचार करून शासनाने ही सुविधा उपलब्ध करून दिल्याने महिला प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. महिलांना सन्मान, सुरक्षितता आणि आवश्यक सुविधा देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

# पालकमंत्री भरत गोगावले यांचा पोलादपूरमध्ये सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगडचे नवनियुक्त पालकमंत्री भरत गोगावले यांचा पोलादपूर तालुक्यातील जनतेने शुक्रवारी स्वागत, सत्कार केला. यावेळी बोलताना त्यांनी, आई-वडिलांनी जन्म दिला, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी उमेदवारी दिली आणि मायबाप जनतेने चारवेळा निवडून दिले, म्हणून आज आपण पालकमंत्री झालो, असे सांगून सर्वच बाबतीत संघर्ष करावा लागला असताना सबुरीका फल मिठा होता है, हा आनंददेखील मिळाल्याचे सांगितले.



व्यासपिठावर पालकमंत्री गोगावले यांच्यासमवेत पत्नी सुषमा गोगावले, मुलगा विकास गोगावले, तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, पं.स.सभापती अविनाश शिंदे, रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, जि. प. सदस्य डॉ. निलेश कुंभार, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगराध्यक्ष अस्मिता पवार, शहर प्रमुख सुरेश पवार, नायक मराठा समाजाचे अध्यक्ष सुनील मोरे, उद्योजक रामदास कळंबे, कृऊबा समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, तालुका महिला संघटक सुवर्णा कदम, विभागप्रमुख सतीश शिंदे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी युवासेना कोकण कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले यांनी, ना. भरतशेठ गोगावले यांच्यावर राज्याची मंत्रिपदाची तसेच रायगडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी आहे. त्यामुळे ते उपलब्ध होतील की नाही, पण आम्ही स्थानिक पदाधिकारी जनतेच्या सेवेसाठी केव्हाही उपलब्ध राहू, अशी ग्वाही दिली.

यावेळी पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष अस्मिता पवार आणि सर्व नगरसेवक तसेच शिवसेना पदाधिकारी यांनी पालकमंत्री भरत गोगावले यांचा भव्य पुष्पहार घालून सत्कार केला. तालुक्यातील विविध संघटनांनीसुद्धा सत्कार केला, तर दुपारी शिवसेनेच्या महिला, पुरुष कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ जेसीबीतून पुष्पवृष्टी करून स्वागत केले. तेथून कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

# 'कर्जतमध्ये स्पर्धा परीक्षा वाचनालय उभारणार'

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विद्यार्थ्यांनी, तरुणांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे. तुम्ही जागा उपलब्ध करून आपण अद्ययावत वाचनालय उभारू. तुमच्या स्वप्नांची फिकीर तुम्ही करू नका, शिक्षणाची, भविष्याची फिकीर करण्यासाठी जिजाऊ तुमच्या सोबत आहे. ध्येयावर लक्ष केंद्रित करून पुढे जा, असा सल्ला जिजाऊ शैक्षणिक आणि सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

नेरळ विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांना जिजाऊ शैक्षणिक आणि सामाजिक संस्थेच्या वतीने वह्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सांबरे बोलत होते. कार्यक्रमास विद्यामंदिर मंडळाचे संयुक्त सचिव विवेक पोतदार, कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक भांडे, पर्यवेक्षक



यांच्यासह प्रसाद थोरवे, अमर मिसाळ, किसान क्रांती संघटनेचे आणि जिजाऊ संस्थेचे जिल्हा सदस्य उत्तम शेळके, जनार्दन म्हसकर, अविनाश भोईर, जयवंत साळुंखे, केतन पोतदार, मिनेश मसणे आदी उपस्थित होते.

सांबरे पुढे म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि मोठी स्वप्नं पाहण्याची क्षमता आहे, मात्र आर्थिक परिस्थिती, साधनांची कमतरता किंवा योग्य मार्गदर्शनाचा अभाव अनेकदा त्यांच्या वाटचालीसमोर अडथळा ठरतो. या भावनेतून शिक्षणाच्या क्षेत्रात काम करत आहोत.

# रोह्यातील युवकाचा तापाने मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा भुवनेश्वर येथील आर्किटेक्टचे शिक्षण पूर्ण केलेला अवघ्या २२ वर्षांचा वरद संतोष पाटील (कोळी) याचा तापाच्या आजाराने दुर्दैवी मृत्यू झाला. वडिलांसोबत गावात आल्यानंतर वरदला उपचारासाठी रुग्णालयात गेला. तेथे उपचार सुरू असतानाच अचानक त्याची प्राणज्योत मालवली. या धक्कादायक घटनेने पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गाव हळहळले आहे.



लहानपणापासून हुशार असलेला वरद अत्यंत नम्र, मनमिळावू आणि समजूतदार स्वभावाचा होता. सर्वांशी आपुलकीने वागणे, प्रत्येकाची जाणीवपूर्वक विचारपूस करणे आणि मोठ्यांचा आदर करणे ही त्याची वैशिष्ट्ये होती. त्यामुळे तो मित्रपरिवारासह गावातील अनेकांच्या जवळचा होता. कालपर्यंत घरात हसत-खेळत वावरणारा वरद आज केवळ छायाचित्रात उरल्याने त्याच्या परिचितांनाही हा धक्का पचवणे कठीण झाले आहे. वैकुंठधाम स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाडमध्ये रानभाजी उत्सव



**महाड : प्रतिनिधी**

पावसाळ्यामध्ये उगवणाऱ्या अनेक वनस्पतींपैकी बऱ्याचशा वनस्पतींची ओळख ही रानभाजी म्हणून होते. या रानभाज्या चवीला पौष्टिक आणि आयुर्वेदिक औषधीय गुणधर्म असल्याने पावसाळ्यामध्ये प्राधान्याने मागणी असते. शहरामध्ये याची ओळख पटवून देण्यासाठी कृषी विभाग आणि कृषी विद्यालयामार्फत महाडमध्ये रानभाजी उत्सवाच्या आयोजन केले होते.

रानभाज्या जपल्या पाहिजे आणि त्यांची ओळख शहरी लोकांना देखील झाली पाहिजे यासाठी अशा प्रकारच्या उत्सवांची गरज असल्याचे मत महाड पंचायत समितीच्या सभापती प्रेरणा सावंत यांनी यावेळी व्यक्त केले.

महाड शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कृषी विभाग आणि कृषी विद्यालय मोहोप्रे यांच्या संयुक्त विद्यमाने या रानभाजी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन सभापती प्रेरणा सावंत यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास उपनगराध्यक्ष संदीप जाधव, पंचायत समितीचे सदस्य संदीप खिडबिडे, महाड कृषी अधिकारी तोरणे, कृषी विद्यालयाचे प्राचार्य वैभव गिम्हवणे, शेतकरी संघटनेचे तुकाराम देशमुख, निलेश पवार आदी उपस्थित होते.

यावेळी महाडमधील आदिवासी महिलांनीदेखील सहभाग घेऊन रानभाज्या उपलब्ध करून दिल्या. या ठिकाणी उपस्थित महाडकरांना कुर्डू, भारंगा, अळू, करटुली, घोळ, टाकळा, फोडशी, कुडा, इत्यादी भाज्यांची ओळख या उत्सवाच्या माध्यमातून मिळाली.

रानभाज्या दुर्मिळ होत चालल्या असून त्यांची ओळख होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे रानभाज्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनादेखील रोजगार उपलब्ध होऊ शकतो, असे मत सभापती प्रेरणा सावंत यांनी व्यक्त केले. रानभाज्या या औषधीय गुणधर्मीय असल्याने पावसाळ्यामध्ये आवर्जून खाल्ल्या पाहिजेत, असे आवाहन कृषी अधिकारी श्री. तोरणे यांनी केले, तर संदीप जाधव यांनीदेखील रानभाज्या आपल्या आरोग्यासाठी आवश्यक असून ऐन पावसाळ्यामध्ये येणाऱ्या रानभाज्या आवर्जून खाल्ल्यास आदिवासी महिलांना उत्तम रोजगार उपलब्ध होतो, असे सांगितले.


उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपकृषी अधिकारी श्री. कोकरे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. मोरे, शिवलंका शेतकरी उत्पादक कंपनी अध्यक्ष श्री. सोनावळे, कृषी महाविद्यालयाचे डॉ. रायकर, प्रा. सावंत, प्रा. घुले, प्रा. चांदे, प्रा. घुले, प्रा. लिंगावळे आणि कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

# स्वर, साधना, संस्कार आणि समाजसेवेचा सुरेल संगम : पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी

२३ ऑगस्ट हा दिवस पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांच्या आयुष्यातील एक विशेष दिवस, मात्र त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य केवळ एका कलावंताला शुभेच्छा देण्यापुरते मर्यादित राहत नाही; तर हा दिवस संगीताची अखंड साधना, गुरुपरंपरेचा सन्मान, वारकरी संप्रदायाचे सात्त्विक संस्कार आणि समाजसेवेशी नाते सांगणाऱ्या एका समर्पित जीवनप्रवासाचा गौरव करण्याचा दिवस ठरतो. संगीत ही नुसती ऐकण्याची किंवा सादर करण्याची कला नाही; तर ती मनाला स्पर्शणारी अनुभूती आहे. स्वरांच्या कंपनातून अंतर्मनाला स्पर्श करणारी, रागांच्या आरोह-अवरोहातून भावविश्व उलगडणारी आणि बंदिशींच्या माध्यमातून परंपरेचा इतिहास जपणारी ही कला साधनेसह संस्कारांचीही वाटचाल असते. या संगीतसाधनेचा अर्थ आपल्या कृतीतून आणि आयुष्यातून सिद्ध करणारे पं. चौधरी यांच्या व्यक्तिमत्त्वात स्वरांची माधुरी, साधनेची शिस्त, संस्कारांची श्रीमंती आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांचा सुरेल मिलाफ अनुभवायला मिळतो.

### सात्त्विक संस्कारांतून उमललेली स्वरांची कळी

महाराष्ट्राच्या भूमीला संतांची, वारकरी संप्रदायाची आणि भक्तिसंगीताची समृद्ध परंपरा लाभली आहे. या परंपरेत भजन, अभंग, कीर्तन आणि शास्त्रीय संगीत यांचा सुरेल संगम दिसतो. अशाच संस्कारक्षम वातावरणात पं. उमेश चौधरी यांच्या संगीतप्रवासाची बीजे रोवली गेली. भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांचा सात्त्विक वारसा त्यांना लाभला. यातून बालपणापासूनच त्यांना संगीताची गोडी लागली. वडिलांकडून लाभलेला भक्तिसंगीताचा वारसा आणि पुढे शास्त्रीय संगीताच्या कठोर साधनेतून विकसित झालेले त्यांचे व्यक्तिमत्त्व हा त्यांच्या कलाप्रवासाचा विलक्षण संगम आहे. एका बाजूला वारकरी परंपरेतील



भक्तिभाव, तर दुसऱ्या बाजूला रागदारी संगीताची अभिजातता या दोन्ही प्रवाहांचा सुंदर मिलाफ त्यांच्या गायकीत अनुभवायला मिळतो.

### रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेतून स्वरांच्या प्रयोगभूमीकडे

रसायनशास्त्राचे पदवीधर असलेल्या पं. उमेश चौधरी यांचा सुरुवातीचा व्यावसायिक प्रवास उद्योगक्षेत्रातून झाला. आयुष्याने त्यांच्यासमोर स्थैर्याची वाट खुली केली होती, परंतु अंतर्मनातील स्वरांची हाक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. मनाच्या गाभाऱ्यात संगीताचा एक निनाद सातत्याने घुमत होता. त्या निनादाने अखेरीस त्यांना स्वरांच्या अथांग विश्वाकडे खेचले. २००३मध्ये चेंबूर येथे झालेल्या अल्लादिया खाँ स्मृती समारंभात उस्ताद अस्लम हुसैन खान यांचे गायन ऐकण्याचा प्रसंग त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या गायकीने ते इतके प्रभावित झाले की त्यांनी तत्काळ उस्ताद अस्लम हुसैन खान यांचे शिष्यत्व स्वीकारले. नोकरीचा राजीनामा देऊन स्वतःला पूर्णवेळ संगीतसाधनेला अर्पण केले.

### संगीतच्या माध्यमातून समाजजागृतीचा अनोखा प्रयोग

संगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजमनाला जागृत करणारे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून पं. उमेश चौधरी यांनी अनेक उपक्रमांना आकार दिला. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून १९२ तासांचा अखंड भजन महोत्सव आयोजित करण्यात आला. या भव्य उपक्रमाची लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचे नमूद केले जाते. भक्ती, संगीत आणि सामाजिक सहभाग यांचा अनोखा संगम घडविणारा हा उपक्रम दीर्घकाळ स्मरणात राहणारा ठरला. संगीताच्या माध्यमातून अवयवदानासारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयावर जनजागृती करण्याचे कामही त्यांनी केले. 'म्युझिक थेरपी'सारख्या उपक्रमांमधून संगीताच्या उपचारात्मक आणि सकारात्मक शक्तीची जाणीव समाजाला करून देण्याचा प्रयत्न केला.

### गुरुशिष्य परंपरेचा दीप तेवत ठेवणारा साधक

भारतीय शास्त्रीय संगीताची खरी ताकद तिच्या गुरुपरंपरेत आहे. या परंपरेचे महत्त्व जाणून पं. उमेश चौधरी यांनी उस्ताद अस्लम हुसैन खान यांच्या मार्गदर्शनाबरोबरच सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका विदुषी शुभदा पराडकर यांच्याकडूनही त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. आग्रा आणि जयपूर-अत्रौली घराण्यांच्या संगीतपरंपरेचा अभ्यास तसेच वारसा जपत आपल्या गायकीला आकार दिला.

### 'वारकरी सांप्रदाय ते आकाशवाणी शास्त्रीय गायक'

संगीतातील शास्त्रशुद्ध शिक्षणाची वाटचाल करताना पं. उमेश चौधरी यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची विशारद पदवी प्राप्त केली. तसेच आकाशवाणीवर सुगम संगीत ते शास्त्रीय गायक म्हणून मान्यता मिळवली. दूरदर्शनवरील 'योगियांचा देव' या मालिकेचे संयोजन आणि पार्श्वगायन करण्याची संधीही त्यांना मिळाली.

### सुवर्ण स्वरमंडल : कलासाधनेचा अनोखा गौरव

शास्त्रीय गायनात स्वरमंडलाचे स्थान विलक्षण आहे. गायकाच्या स्वरविश्वाला सूक्ष्म आणि सुरेल आधार देणारे हे वाद्य केवळ साथीचे साधन नसून गायनातील भावविश्व अधिक समृद्ध करणारे माध्यम आहे. पं. उमेश चौधरी यांना यशवंत महाराज यांच्या हस्ते सुवर्ण स्वरमंडल प्रदान करण्यात आले. जगातील पहिले शुद्ध सोन्याचा मुलामा असलेले सुवर्ण स्वरमंडल म्हणून वर्णन करण्यात आलेला हा सन्मान त्यांच्या कलासाधनेतील एक आगळा अध्याय ठरला.

### सन्मानांनी उजळलेली संगीतसेवा

पं. उमेश चौधरी यांच्या कलाप्रवासाची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली आहे. पं. भीमसेन जोशी गानगंधर्व पुरस्कार, रायगड भूषण, रायगड गौरव यांसह विविध पुरस्कार आणि मानसन्मानांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. सन्मान मिळाल्यानंतरही त्यांच्या रियाजात खंड पडलेला नाही आणि नव्या शिकण्याची त्यांची भूक कमी झालेली नाही.

संगीतप्रवासाचा डिजिटल परिचय करून देणारी त्यांची नव्याने सुरू करण्यात आलेली वेबसाईट त्यांच्या कलाजीवनातील एक नवे पर्व ठरले आहे. नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या प्रतिभेला योग्य संधी मिळावी आणि संगीताच्या क्षेत्रात नव्या पिढीचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने त्यांनी 'मासिक सभा' या उपक्रमाला सुरुवात केली. त्यांच्या स्वरांची मैफल अशीच रंगत राहो, रागदारीच्या आकाशात त्यांच्या गायकीचा निनाद अधिकाधिक दूरवर पोहचत राहो, नव्या पिढीला त्यांच्या साधनेतून प्रेरणा मिळत राहो आणि संगीताच्या माध्यमातून समाजसेवेचा त्यांचा वसा अधिक विस्तारत राहो, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा.

**-शिवव्याख्याते, ॲड. सोपान आढाव**, ऐरोली, नवी मुंबई

# आजपासून भारत-श्रीलंका दुसरी कसोटी

**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताने १६५ धावांनी शानदार विजय मिळवत दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. आता रविवार (दिद.२३)पासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीतही विजय मिळवून मालिका २-० अशी खिशात घालण्याचे भारतीय संघाचे लक्ष्य असेल.



कर्णधार शुबमन गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पहिल्या कसोटीत फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत प्रभावी कामगिरी केली. विशेषतः मानव सुथारने दोन्ही डावांत मिळून १० विकेट्स घेत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे दुसऱ्या कसोटीसाठी प्लेइंग-११ निवडताना संघ व्यवस्थापनासमोर काही महत्त्वाचे निर्णय असणार आहेत.

दुसऱ्या कसोटीसाठी भारतीय संघात सर्वात मोठा बदल गोलंदाजी विभागात होण्याची शक्यता आहे. पहिल्या कसोटीत कुलदीप यादवला फारशी गोलंदाजी मिळाली नव्हती. कर्णधार शुबमन गिलने त्याच्याकडून केवळ २५ षटके गोलंदाजी करून घेतली. दुसरीकडे मानव सुथारने आपल्या फिरकीने श्रीलंकेच्या फलंदाजांना अडचणीत आणले, तर रवींद्र जडेजानेही मोठ्या प्रमाणात गोलंदाजी केली. त्यामुळे कुलदीपच्या जागी मध्य प्रदेशचा अष्टपैलू खेळाडू सारांश जैन याला कसोटी पदार्पणाची संधी मिळण्याची शक्यता आहे. ३३ वर्षीय सारांश जैन उजव्या हाताने फलंदाजी करण्यासोबतच ऑफ-स्पिन गोलंदाजी करतो. श्रीलंकेच्या फिरकीला अनुकूल परिस्थितीत ऑफ-स्पिनचा पर्याय भारतासाठी उपयुक्त ठरू शकतो. वेगवान गोलंदाजी विभागात मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांची जोडी कायम राहण्याची शक्यता आहे. गुरनूर ब्रारच्या समावेशाची चर्चा असली तरी दुसऱ्या कसोटीत त्याला पदार्पणाची संधी मिळण्याची शक्यता तुलनेने कमी आहे.

फलंदाजीच्या क्रमात मोठा बदल होण्याची शक्यता मात्र कमी आहे. यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, देवदत्त पडिक्कल आणि कर्णधार शुभमन गिल यांनी पहिल्या कसोटीत संघाला चांगली सुरुवात आणि भक्कम आधार दिला. विशेषतः पडिक्कलने शानदार फलंदाजी करत सामनावीराचा पुरस्कार मिळवला. त्यामुळे त्याला दुसऱ्या कसोटीतून वगळण्याची शक्यता कमी आहे.

पहिल्या कसोटीत विजय मिळवून देणाऱ्या संयोजनात फार मोठे बदल न करता केवळ परिस्थितीनुसार एक-दोन बदल करण्याकडे टीम मॅनेजमेंटचा कल असू शकतो.

### ध्रुवमुळे सरफराजला प्रतीक्षा?

पहिल्या कसोटीत ध्रुव जुरेलने पहिल्या डावात शानदार अर्धशतक झळकावत आपली उपयुक्तता सिद्ध केली. त्यामुळे यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून त्याचे स्थान आणखी मजबूत झाले आहे. परिणामी संघात स्थान मिळवण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या सरफराज खानला आणखी काही काळ बाकावर बसावे लागू शकते. ऋषभ पंत आणि जुरेल हे दोन यष्टीरक्षक-फलंदाज उपलब्ध असल्याने भारतीय संघाकडे आधीच चांगले पर्याय आहेत.

# बांगलादेशचा ६४ धावांमध्ये खुर्दा

## दुसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचे दमदार कमबॅक

**मॅके : वृत्तसंस्था**

दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने पाहुण्या बांगलादेशचा डाव अवघ्या ६४ धावांत संपवला. ही बांगलादेशची चौथी निच्चांकी धावसंख्या ठरली. पहिल्या कसोटीतील लाजिरवाण्या पराभवानंतर 'कांगारूं'नी दमदार कमबॅक केले. पहिल्या दिवसअखेर ऑस्ट्रेलियाने ८ बाद १६५ धावा झाल्या असून त्यांनी १०१ धावांची आघाडी घेतली आहे.



ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मिचेल स्टार्कने पहिल्याच चेंडूवर बांगलादेशला पहिला धक्का दिला. इदमान इस्लाम खातेही न उघडता बाद झाला. आपल्या दुसऱ्या षटकात स्टार्कने तंजीद हसन तमीम आणि कर्णधार नजमुल हुसेन शांतो यांची विकेट घेत बांगलादेशला धक्क्यावर धक्के दिले. या दोघांनाही खाते उघडता आले नाही. आघाडीचे तीन फलंदाज खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतण्याची कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ ठरली.

बांगलादेशच्या पहिल्या डावातील सातव्या षटकात मिचेल स्टार्कने पाच बळींचा टप्पा गाठला. अवघ्या १२ धावांत त्याने बांगलादेशचा अर्धा संघ तंबूत धाडला होता. लिटन दासही शून्यावर बाद झाला. बांगलादेशने ३९ धावांत नऊ विकेट्स गमावल्या होत्या. तैजुल इस्लाम आणि शोरिफुल इस्लाम जोडीने अखेरच्या विकेटसाठी या डावातील २५ धावांची सर्वोच्च भागीदारी रचली. स्टार्कनेच शोरिफुलची विकेट घेत बांगलादेशचा पहिला डाव ६४ धावांत संपवला. त्याच्याशिवाय कर्णधार पॅट कमिन्सने तीन, तर जोश हेजलवूडने एक विकेट घेतली.

### मिचेल स्टार्कचा कहर

या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा जलदगती गोलंदाज मिचेल स्टार्कने पाच विकेट घेत बांगलादेशी फलंदाजांची दाणादण उडवली. कसोटी सामन्यात चौथ्यांदा स्टार्कने पहिल्याच चेंडूवर विकेट घेतली. यासोबतच पहिल्या षटकात सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीतही स्टार्क अव्वल स्थानी (नऊ विकेट्स) आहे. त्याने इंग्लंडचा माजी गोलंदाज जेम्स अँडरसनला मागे टाकले. या इंग्लिश गोलंदाजाने पहिल्या षटकात आठ विकेट्स घेतल्या आहेत. स्टार्कने आपल्या कसोटी कारकिर्दीत चौथ्यांदा सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर विकेट घेण्याची कामगिरी केली. यासह अशी कामगिरी चार वेगवेगळ्या कसोटी सामन्यांत करणारा तो इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे.

# महिला हॉकी वर्ल्डकपमध्ये भारताची लढत आज ऑस्ट्रेलियाशी

### उपांत्य फेरीसाठी विजय अनिवार्य

**ॲमस्टेलवीन : वृत्तसंस्था**

महिला हॉकी विश्वचषकाच्या दुसऱ्या फेरीत भारतीय महिला हॉकी संघाला गतविजेत्या ऑलिम्पिक आणि विश्वविजेत्या नेदरलँड्सकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे भारतीय संघाचा उपांत्य फेरीचा मार्ग कठीण झाला आहे. आता भारताला रविवारी (दि.२३) होणाऱ्या दुसऱ्या फेरीतील अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाला हरवावे लागेल.

ॲमस्टेलवीन येथे झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात यजमान संघाने दोन्ही गोल पेनल्टी कॉर्नरद्वारे केले. नेदरलँड्सकडून यबी जानसेनने सामन्याच्या दुसऱ्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून संघाला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ३८व्या मिनिटाला फ्रेडरिक माटलाने आणखी एका पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून यजमान संघाची आघाडी ०-२ अशी वाढवली. भारतीय संघाने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र डच संघाच्या मजबूत बचावाला भेदण्यात ते अपयशी ठरले. भारत शेवटपर्यंत एकही गोल करू शकला नाही आणि सामना ०-२ने गमावला.

# लुसाने डायमंड लीगमध्ये नीरजला 'रौप्य'

**लुसाने : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याने लुसाने डायमंड लीगमध्ये दमदार कामगिरी करत यंदाच्या हंगामातील सर्वोत्तम थ्रो नोंदवला. नीरजने ८८.०५ मीटर भालाफेक करत दुसरे स्थान मिळवले, मात्र अवघ्या नऊ सेंटीमीटरच्या फरकामुळे त्याला सुवर्णपदकापासून वंचित राहावे लागले.

श्रीलंकेचा रुमेश तरंगा पथिरागे याने ८८.१४ मीटरचा थ्रो करत पहिला क्रमांक पटकावला, तर ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स ८६.६९ मीटरच्या थ्रोसह तिसऱ्या स्थानावर राहिला. लुसाने डायमंड लीगमधील नीरजचे दुसरे स्थान त्याच्यासाठी महत्त्वाचे ठरले आहे. ज्यूरिखमध्ये होणाऱ्या अंतिम पात्रता स्पर्धेपूर्वी नीरजने फायनलमध्ये स्थान मिळवण्याच्या शर्यतीत आपली दावेदारी आणखी मजबूत केली आहे.

# माधवी बिधुरीचे अनोखे सेलिब्रेशन चर्चेत


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या भारताची एका महिला क्रिकेटपटू सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. महिलांच्या दिल्ली प्रीमियर लीग २०२६च्या सलामीच्या सामन्यात सेंट्रल दिल्ली क्वीन्सची गोलंदाज माधवी बिधुरीने विकेट घेताच केलेल्या सेलिब्रेशनचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

साउथ दिल्ली सुपरस्टार्स संघाने सेंट्रल दिल्ली क्वीन्स संघासमोर समोर १५७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात सेंट्रल दिल्ली क्वीन्सला २० षटकांत सात गडी गमावून केवळ १२७ धावाच करता आल्या. मेधावीने आपल्या संघासाठी चार षटके गोलंदाजी करताना २४ धावांत दोन बळी घेतले. तिने निशिका सिंगला बाद करून सामन्यातील आपला दुसरा बळी मिळवला; ही विकेट घेतल्यानंतर तिने ज्या प्रकारे जल्लोष केला, तो लगेचच चर्चेचा विषय ठरला.

निशिका सिंगची विकेट घेतल्यानंतर मेधावीने नेहमीप्रमाणे जल्लोष न करता आपले हात वर-खाली हलवत एक वेगळाच '६-७'





(६-७) असा जल्लोष केला. सामन्यानंतर मेधवीने या अनोख्या सेलिब्रेशनमागचे गुपित उघड केले. तिने सांगितले की, तिला सुरुवातीला १२ क्रमांकाची जर्सी हवी होती, पण तो क्रमांक आधीच दुसऱ्या खेळाडूने घेतला होता. त्यानंतर तिच्या धाकट्या बहिणीने तिला ६७ हा क्रमांक निवडण्याची सूचना केली.

या जल्लोषाचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आणि मेधवी प्रकाशझोतात आली. तेव्हापासून ती सतत चर्चेत राहिली असून तिच्या सामन्यांशी संबंधित अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत आहेत.

# कार्तिक त्यागीच्या परफेक्ट यॉर्करने स्टंपचे तुकडे

**लखनऊ : वृत्तसंस्था**



आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्स संघाचा भाग असलेल्या कार्तिक त्यागीने यूपी टी-२० लीगच्या सामन्यात कमालीचा यॉर्कर टाकत फलंदाजाला बाद केले. या वेगवान व अचूक चेंडूमुळे मधला स्टंप तुटला.

नोएडा किंग्स संघाचा फलंदाज शौर्य सिंह बचावात्मक फटका खेळण्याचा प्रयत्न करत असताना मेरठ मॅव्हरिक्सच्या कार्तिक त्यागीने त्याला क्लीन बोल्ड केले. याचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

अंडर १९ वर्ल्डकप स्टार असलेल्या कार्तिकच्या या दमदार कामगिरीमुळे त्याच्या मेरठ संघाला कमी धावसंख्या उभारूनही विजय मिळवण्यात मदत झाली. मेरठ संघ अवघ्या ११६ धावांत ऑलआऊट झाला होता, मात्र कार्तिकने आपल्या तीन षटकांच्या स्पेलमध्ये १२ धावा देत तीन विकेट्स घेत नोएडा किंग्सची अवस्था ११व्या षटकात सहा विकेट्स गमावून अवघ्या ५१ धावा अशी केली. त्याच्या भेदक गोलंदाजीमुळे मेरठने डीएलएस पद्धतीने २३ धावांनी विजय मिळवला. कार्तिक या स्पर्धेमध्ये ११ सामन्यांत १८ विकेट्स घेतल्या आहेत.









पनवेल, माथेरान : निसर्गरम्य डोंगररांगा, हिरवाईने नटलेला परिसर, आल्हाददायक वातावरण आणि ऊर्जेने भरलेले ट्रेकर्स अशा आनंददायी वातावरणात धोदाणी ते माथेरान इको-फ्रेंडली ट्रेक शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत नागरिक, युवक, महिला आणि निसर्गप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वनराईच्या सानिध्यात ट्रेकिंगचा आनंद लुटला. ट्रेकद्वारे फिटनेस, आरोग्यदायी जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.





# माझे काम ट्रॉफी जिंकणे, व्ह्यूज-लाइक्स मिळवणे नाही!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ रविवारी (दि.२३) श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी मैदानात उतरणार आहे. या सामन्यापूर्वी टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्याने माझे काम ट्रॉफी जिंकणे आहे, सोशल मीडियावर व्ह्यूज आणि लाइक्स मिळवणे नाही, असे वक्तव्य केले.

गौतम गंभीर मुख्य प्रशिक्षक झाल्यानंतर कसोटी क्रिकेटमध्ये टीम इंडियाची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. भारतीय संघाने मायदेशातील दोन मालिकांसह तीन मोठ्या कसोटी मालिका गमावल्या आहेत. या

### गंभीरचे वक्तव्य



पार्श्वभूमीवर सोशल मीडियावरील टीका आणि बाहेरील चर्चांबाबत काय मत आहे? असा प्रश्न गौतम गंभीरला विचारण्यात आला होता. यावर तो म्हणाला की, माझे काम ट्रॉफी जिंकणे आहे, सोशल मीडियावर व्ह्यूज आणि लाइक्स मिळवणे नाही. आम्ही कोणत्याही संघर्षातून जात नाही आणि क्रमवारी आमच्यासाठी महत्त्वाची नाही. संघात बदलाचा टप्पा सुरू आहे. अशा वेळी काही चढ-उतार येतात, मात्र इंग्लंड दौऱ्यानंतर आम्ही सातत्याने चांगली कामगिरी करत आहोत.

गॉलमध्ये झालेल्या पहिल्या कसोटीत भारतासाठी देवदत्त पड्डिकलने १६७ धावांची खेळी केली, तर डावखुरा फिरकीपटू मानव सुथारने १० विकेट्स घेतल्या. या दोघांच्या कामगिरीवर गंभीरने समाधान व्यक्त केले, मात्र अजूनही बरेच काम बाकी असल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघ १-०ने आघाडीवर आहे. दुसरा सामना जिंकून यजमान श्रीलंकेला क्लीन स्वीप देण्याच्या इराद्याने टीम इंडिया सज्ज आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com